**सुविचार**

जब परमात्मा मेरे पिता, गुरु, मार्ग– दर्शक आदि हैं तो इस दुनिया में मुझे किसका डर है ?

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शुक्रवार दि. २४ मे २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१८७ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


# मुख्यमंत्री दुष्काळसदृश परिस्थितीचा आढावा घेणार

छत्रपती संभाजीनगर : एकीकडे निवडणुकीचे वारे तर दुसरीकडे उन्हाच्या लाटांनी महाराष्ट्र चांगलाच तापला आहे. काही दिवसांपूर्वी आलेल्या अवकाळी पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला होता. मात्र पुन्हा महाराष्ट्रात उकाड्याने चांगलाच पेट घेतला आहे. कडक उन्हामुळे नागरिक हैराण झालेच आहेत त्यासोबत प्राण्यांचेही मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत.

अशातच सध्या मराठवाड्यात दुष्काळाची परिस्थिती आणखी भीषण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेणार आहेत. या दुष्काळासंदर्भात विभागीय आयुक्त कार्यालयात एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वाची बैठक होणार आहे. त्याचसोबत या बैठकीला सर्व जिल्हाधिकारी, पालकमंत्री, कृषी अधिकारी, महावितरणचे अधिकारी यासह इतर अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आज दुपारी ३ वाजता छत्रपती संभाजीनगर मधील विभागीय आयुक्त कार्यालयात बैठक होणार आहे. या बैठकीत मराठवाड्यातील दुष्काळसदृश परिस्थितीची आणि भीषण पाणी टंचाईवर प्रामुख्याने चर्चा होणार आहे. याबाबत तत्काळ मदत कशी आणि कोणती करावी याचंही नियोजन करण्यात येणार आहे. तसेच पाळीव प्राण्यांना लागणाऱ्या चाऱ्याचा पुरवठा कसा करावा, या संदर्भातदेखील या बैठकीत चर्चा होणार आहे. तशी माहिती मुख्यमंत्री कार्यालयाने दिली आहे.

आचारसंहिता शिथील करण्याची मागणी

आगामी काळात ही स्थिती जास्तच गंभीर होण्याची शक्यता आहे. (पान ६ वर)



**केंद्रीय मंत्री श्री. भगवंत खुब्बा यांनी श्री. बसवराज पाटील मुरुमकर यांचे निवासस्थानी भेट दिली. त्याप्रसंगी श्री. बापुराव पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी श्री. बसवराज पाटील, प्रा. ॲड. बी.व्ही. मोतीपवळे, श्री. बदोले सावकार, श्री. कंटेकुरे, प्राचार्य श्री. गरुड व त्यांच्या सोबत आलेले बिदरचे श्री. खानापूरे, श्री. कुंभार इत्यादी.**

## अल्पवयीन मुलाला कार देऊन चुक केली

पुणे : पुणे हिट अ‍ॅन्ड रन प्रकरणाची गुरूवार दि. २३ मे रोजी पुण्यातील कोर्टात युक्तीवाद सुरू असताना विशाल अगरवालने दिलेल्या जबाबात अनेक शंका उपस्थित केल्या जात आहे. त्यावरुन आता आरोप प्रत्यारोप सुरु झाले आहेत आणि अनेक प्रश्नदेखील उपस्थित करण्यात येत आहे. त्यातच माझ्या मुलाला गाडी देऊन मी चूक केली, अशी कबुली विशाल अगरवाल यांनी पोलिसांसमोर दिली आहे. त्याला गाडी देणे चुकीचे आहे असे म्हणत विशाल अगरवालने खंत व्यक्त केली.

विशाल अगरवालने खंत व्यक्त केली आणि कबुली जरी दिली असली तरीही त्यांनी दिलेल्या बाकी जबाबातून अनेक शंका उपस्थित केल्या जात आहे. विशाल अग्रवाल यांची सात दिवसांची कोठडी पुणे पोलिसांनी मागितली होती. मात्र पुणे पोलिसांनी अग्रवालला २४ तारखेपर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली आहे. या दिवसात विशाल अगरवाल यांनी विना नंबर प्लेट गाडी का चालवायला दिली? वडिलांनी मुलाला पब मध्ये जाण्याची का संमती दिली? मुलाला खर्च करण्यासाठी पॉकिट मनी कुठल्या स्वरूपात दिला? गुन्हा दाखल केल्यानंतर विशाल अगरवाल हे फरार का झाले? ते जेव्हा संभाजीनगरमध्ये आढळून आले तेव्हा त्यांच्याकडे एक साधा मोबाईल मिळून आला बाकीचे त्यांचे मोबाईल कुठे आहेत? याची चौकशी केली जाणार आहे.

चालकाने नोंदवला जबाब (पान ६ वर)

# बारामतीत दोन भावांमध्ये जुंपणार? पवारांची यंग ब्रिगेड विधानसभेच्या तयारीला

बारामती- राज्यातील लोकसभा निवडणुकीचं वारं आता शांत झालंय. राज्यातील संपूर्ण पाच टप्प्यातील निवडणूक पार पडली आहे. यंदाच्या निवडणुकीत सर्वात हायप्रोफाईल सीट ठरलीये ती बारामती... बारामतीत नणंद विरुद्ध भावजय असा सामना रंगला होता. यावर आता कोणता निकाल लागतोय? यावर सर्वांचं लक्ष लागलंय. अशातच आता लोकसभा निवडणुकीचा धुरळा खाली बसतो न बसतो तोच बारामतीत पवारांच्या दोन्ही गटातील यंग ब्रिगेड पुढील विधानसभेसाठी आत्तापासूनच तयारीला लागली आहे. चुलत्या पुतण्यानंतर आता बारामतीत दोन भावांमध्ये सामना रंगण्याची शक्यता आहे.

एकीकडे राष्ट्रवादीच्या शरदचंद्र पवार गटाकडून युगेंद्र पवार यांनी जनता दरबाराचे आयोजन करत नागरिकांच्या समस्या सोडविण्याचा धडाका लावला आहे तर



दुसरीकडे आज गुरुवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे धाकटे पुत्र जय पवार यांनीही राष्ट्रवादी भवनात जनता दरबार घेत युगेंद्र यांना प्रत्युत्तर दिलेय. त्यामुळे आता चुलत्या पुतण्यांच्या राजकीय धूलवडीनंतर या दोन चुलत भावांच्या जनता दरबाराची बारामतीत जोरदार चर्चा सुरू आहे.

अजितदादांवर थेट टीका करणारे युगेंद्र पवार बारामतीत जनता दरबार घेत राजकारणात सक्रिय झाले झाल्याने ते विधानसभा निवडणूक लढणार का? असा सवाल उपस्थित केला जातोय. मी याबाबत विचार केला नाही. मला लोकांची कामं करायची आहेत, अजून मला वेळ आहे, असं म्हणत युगेंद्र पवार यांनी उत्तर देणं टाळलं होतं. मात्र, आता थेट जनता दरबार भरवल्याने आता युगेंद्र पवार सुप्रिया सुळेंची बाजू भक्कमपणे मांडत असल्याचं दिसतंय.

दरम्यान, जय पवार लोकसभा निवडणुकीपासून सक्रिय झाले आहेत. बारामती लोकसभेसाठी अजित पवारांची प्रतिष्ठा पणाला लागली असताना जय पवार यांनी अचानक अंतरवाली सराटीत मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली होती. अजित पवार यांचे मोठे चिरंजीव पार्थ पवार यांच्यासोबतच छोटे चिरंजीव जय (पान ६ वर)

# भार्गवी कुलकर्णी यांचे कला प्रदर्शन

नवी दिल्ली - येथील हॅबिटॅट सेंटर नवी दिल्ली येथे कु. भार्गवी अतुलचंद्र कुलकर्णी यांनी ३७ बाय ३७ इंची कॅनव्हासवर ॲक्रीलिक मेडियम पेंटिंग केली असून यात इक्स्टसी आणि **दि मॉर्निंग ग्लोरी** या शिर्षकाचे पेंटिंगचे वरील सेंटरला प्रदर्शन पहिलदाच आयोजित केले असून. सर्वांनी या प्रदर्शनाला भेट देऊन उदयोन्मुख कलाकारास प्रोहसाहन द्यावे असे आवाहन करण्यात आले आहे.



कु. भार्गवी या माऊंट मेरी स्कूल दिल्ली कॅन्ट येथे ९ व्या वर्गात शिकत असून त्यांचे वय १४ वर्षाचे आहे. त्यांना ड्राईग, पेंटिंगची वयाच्या ४ थ्या वर्षापासून छंद होता. त्यांनी हातानी पेन्सिल स्केच, वाटर कलर, पोस्टल कलर, ॲक्रॅलिक कलर्स, शाई इत्यादीचा उपयोग करून आपले पेंटिंगची कला अगदी कमी वयात विकसित केली आहे. त्यांनी वरील प्रमाणे चित्रकला निनिराळ्या पद्धतीने उदा. मॉडर्न आर्ट, डूडल, मंडाला, झेंन्टॅगल, सेमी अब्स्ट्रॅक्ट इत्यादी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्या सूप्रसिद्ध कलाकार श्री. साजल बॅनर्जी यांची शिष्या आहेत. त्यांचा लॉन टेनिस, चेस आणि पियानो मध्येहि छंद आहे. प्रदर्शनाची वेळ सकाळी ११ ते ७.३० पर्यंत.



कु. भार्गवी या नवी दिल्ली येथील एमआयएचे डीजी श्री. अतुलचंद्र कुलकर्णी व त्यांच्या सुविद्यपत्नी अश्विनी यांची कन्या आहेत.

# विलासरावजी देशमुख यांच्या ७९ व्या जयंतीनिमीत्त

## विलासबाग, बाभळगाव येथे आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन

लातूर प्रतिनिधी - महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आदरणीय विलासराव देशमुख यांच्या ७९ जयंतीनिमित्त रवीवार दि. २६, मे २०२४ रोजी सकाळी ९.०० वाजता , बाभळगाव येथील विलासबागेत सार्वजनिक आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आणि केंद्रात मंत्री म्हणून आदरणीय विलासरावजी देशमुख साहेब यांनी असंख्य कल्याणकारी निर्णय घेतले. आपल्या राजकीय कार्यकाळात लोकहित डोळ्यासमोर ठेवून त्यांनी घेतलेले निर्णय ऐतिहासीक ठरले आहेत. राजकारणातले आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून आदरणीय विलासराव देशमुख साहेबांची ओळख आहे. सन १९८० च्या विधानसभा निवडणुकीत लातूर मतदारसंघातून विलासराव देशमुख साहेब निवडून आले आणि राज्यमंत्री, मुख्यमंत्री अशी विलासराव देशमुख साहेब यांची वाटचाल महाराष्ट्राला वाखाणण्याजोगी अशीच होती. राजकारणातले आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून आदरणीय विलासराव देशमुख साहेबांची ओळख राहिली आहे. लोकाभिमुख नेतृत्व आणि प्रसन्न व्यक्तिमत्व म्हणून ते सर्व परिचित होते. यावर्षी त्यांच्या ७९ व्या जयंतीनिमित्त रविवार दि. २६, मे २०२४ बाभळगाव येथील विलासबाग येथे आयोजित सार्वजनिक जयंती सभेतून त्यांच्या कार्याला स्मरणपूर्वक आदरांजली वाहण्यात येणार आहे.

या सभेसाठी सकाळी सर्वांनी ८.४५ वाजता विलासबाग येथे स्थानापन्न व्हावे अशी अपेक्षा आहे. सकाळी ९.०० वाजता सुप्रसिद्ध सिने पार्श्वगायक गायक मंगेश बोरगावकर व त्यांच्या सहकाऱ्यांकडून शास्त्रीय संगीताच्या माध्यमातून भावस्वरांजली हा कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर उपस्थित सर्वांनी पुष्पांजली अर्पण केल्यानंतर १०.०० वाजता आदरांजली सभेचा समारोप होईल. या सभेचे सुत्रसंचालन बाळकृष्ण धायगुडे व सचिन सुर्यवंशी करणार आहेत. या आदरांजली कार्यक्रमास विलासबाग, बाभळगाव येथे जनतेने आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन देशमुख कुटूंबियांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ग्रामीण टी–१० स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज काँटों की टक्कर

**गतविजेता रेणापूर, लातूर शहर उपांत्य फेरीत दाखल; उदगीर, अहमदपूर संघातही संघर्षपूर्ण लढती**

लातूर प्रतिनिधी – लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिपच्या तिस–या पर्वातील महाविजेता होण्यासाठी ४ संघ आज (दि.२४) शुक्रवारी उपांत्यफेरीत एकमेकांशी भिडणार आहेत. गतविजेता रेणापूर आणि लातूर शहर संघासह अहमदपूर विरुद्ध शिरुर अनंतपाळ आणि उदगीर विरुद्ध निलंगा यांच्यातील विजयी संघात मकाँटो की टक्करफ अनुभवायला मिळणार आहे. अंतिम सामन्यात कोण एकमेकांशी भिडेल आणि तिस–या पर्वातील महाविजेता कोण होणार, याची क्रीडारसिकांत उत्सुकता आहे.




लातूर क्रीडा संकुल येथे सुरु असलेल्या लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिप ग्रामीण टी १० स्पर्धेत आज (दि.२३) गतविजेत्या रेणापूर संघाने चाकूर संघाला हरवत उपांत्य फेरीत शानदार प्रवेश केला आहे. आकाश आडे ५१(१८) आणि सचिन पवार ५०(२१) यांच्या अर्धशतकीय खेळीने रेणापूरने विजयाला गवसणी घातली आहे. दुस–या सामन्यात लातूर शहर संघाने लोहाविरुद्ध मोठा विजय मिळवत उपांत्य फेरी गाठली आहे. उपांत्यफेरीसाठी सुरु असलेल्या अहमदपूर विरुद्ध शिरुर अनंतपाळ आणि उदगीर विरुद्ध निलंगा संघांतही रोमांचक लढती सुरु आहेत.

लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिपच्या पहिल्या उपांत्यफेरीसाठी झालेल्या सामन्यात गतविजेत्या रेणापूर संघाचे चाकूर संघाचा ८ गडी राखून दणदणीत विजय मिळविला. ग्रामीण टी १० च्या मागील हंगामात तिस–या स्थानी असलेल्या चाकूर संघाने या हंगामातही चांगला खेळ केला. पहिल्यांदा फलंदाजीसाठी मैदानात (पान ६ वर)

# चार हजार पेक्षा अधिक बीज गोळे बनविण्यात आली

## जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांचा सक्रिय सहभाग

**लातूर / प्रतिनिधी-** ग्रीन लातूर वृक्ष टीम व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था लातूर यांच्या वतीने बुद्ध पौर्णिमा निमित्ताने बीज गोळे किंवा सीड बॉल बनवण्याचा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमामध्ये लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी सौ. वर्षा घुगे ठाकूर मॅडम यांनी सक्रिय सहभाग नोंदवून बीजगोळे बनविले.

आज गुरुवारी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या रंगनाथ झालेल्या कार्यक्रमांमध्ये सर्वप्रथम बुद्ध पौर्णिमा निमित्त जिल्हाधिकारी सौ वर्षा घुगे ठाकूर यांच्या द्वारे भगवान बुद्ध यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व बुद्ध पौर्णिमा निमित्त बोधिवृक्ष म्हणजे पिंपळ वृक्षाचे रोपण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी नगरपालिका सहआयुक्त माननीय श्री रामदासजी कोकरे, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे उपप्राचार्य श्री जाधव सर, ग्रीन लातुर वृक्ष टीमचे सर्व सदस्य व




शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे विद्यार्थी विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

या सर्वांनी मिळून चार हजार पेक्षा अधिक बीजगोळे किंवा सीड बॉल बनविले. या बीज गोळ्यामध्ये विशेष:ताने तुळशीच्या बिया, सब्जाच्या बिया पिंपळाच्या बिया होत्या. ग्रीन लातूर पेक्षा टीम द्वारे गेल्या वर्षीपासून तुळशीच्या रोपांचा उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे. यामध्ये रक्षाबंधन निमित्ताने सहा हजार तुळशीच्या बियांच्या राख्या बनवण्यात आल्या होत्या, भेटतील त्या व्यक्तींना तुळशीच्या बियांचे पॅकेट वाटप करण्यात येत असतात, अंदाजे १५ ते २० हजार तुळशी बियांची पॅकेटे आज पर्यंत वाटप करण्यात आलेली आहेत. हाच उपक्रम पुढे घेऊन जात असताना तुळशी बियांचे सीडबॉल किंवा बीज गोळे आज बनवण्यात आले आहेत. (पान ६ वर)

# पाणी टंचाई निवारण्यासाठी उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करा:जिल्हाधिकारी

लातूर, : जिल्ह्यातील पाणी टंचाई निवारण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या आराखड्यातील उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या पाणी टंचाईविषयक आढावा बैठकीत दिल्या. तसेच सर्व तालुक्यातील पाणी टंचाईच्या सद्यस्थितीचा त्यांनी आढावा घेतला.

प्रभारी अपर जिल्हाधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यावेळी उपस्थित होते.




जिल्ह्यातील पाणी टंचाईची परिस्थिती विचारात घेवून शहरी भागासोबतच गाव, वाड्या-वस्त्यांवर पाणी पुरवठा करण्यासाठी विहिरी, विंधन विहारींचे अधिग्रहण, नळ योजनांची दुरुस्ती, तात्पुरती पूरक नळ योजना, नवीन विंधन विहिरी, टँकरद्वारे पाणी पुरवठा आदी विविध बाबींचा समावेश असलेला पाणी टंचाई कृती आराखडा मंजूर करण्यात आला आहे. तसेच या विहिरी, विंधन विहिरींचे अधिग्रहण आणि टँकरद्वारे पाणी पुरवठा आदी उपाययोजना जलद गतीने राबविण्यासाठी या उपाययोजना मंजुरीचे अधिकार उपविभागीय महसूल अधिकारी यांना प्रदान केले आहेत. त्यानुसार जिल्ह्यात कोणत्याही गाव, वाडी-वस्तीवर पाणी टंचाईची समस्या निर्माण झाल्यास त्यादृष्टीने तातडीने उपाययोजना करून नागरिकांना पाणी पुरवठा करण्यात यावा, असे जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

लातूर शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या मांजरा धरणातील उपलब्ध पाणीसाठा विचारात घेवून सध्या शहरात चार दिवसाआड पाणी पुरवठा केला जात आहे. धरणातील जिवंत आणि मृत पाणीसाठ्यातून शहराला सप्टेंबर २०२४ पर्यंत पाणी पुरवठा केला जावू शकतो. तसेच जिल्ह्यातील पशुधनाला जूनअखेरपर्यंत पुरेल इतका चारा उपलब्ध असल्याचे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

असा आहे पाणी टंचाई कृती आराखडा

जिल्ह्यातील पाणी टंचाई निवारणार्थ ऑक्टोबर २०२३ ते जून (पान ६ वर)

# स्वामी विवेकानंद ज्युनियर कॉलेजमधील गुणवंतांचा सत्कार



लातूर/ प्रतिनिधी- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीने फेब्रूवारी-मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वी च्या बोर्ड परीक्षेत स्वामी विवेकानंद ज्युनियर कॉलेज लातूर कला, वाणिज्य, विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार भाजपा युवा नेते तथा भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजितसिंह शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्याहस्ते करण्यात आला.

स्वामी विवेकानंद ज्युनियर कॉलेजच्या विज्ञान शाखेतून ८३ टक्के गुण घेऊन अंकिता यादव प्रथम, ८२ टक्के गुण घेऊन प्राची बिरादार ही विद्यार्थीनी द्वितीय तर अस्मिता यादव ही विद्यार्थीनी ८१ टक्के गुण घेऊन तृतीय आलेली आहे. वाणिज्य शाखेतून लक्ष्मी पवार ही विद्यार्थीनी ८१ टक्के गुण घेऊन प्रथम, सायली शिंदे ही विद्यार्थीनी ७५ टक्के गुण घेऊन द्वितीय तर समर्थ मगर हा विद्यार्थी ७० टक्के गुण घेऊन तृतीय आलेला आहे तर कला शाखेतून अनुष्का पवार ही विद्यार्थीनी ८२ टक्के गुण घेऊन प्रथम, प्रांजली मगर ७८ टक्के गुण घेऊन द्वितीय व अदित्य कसबे हा विद्यार्थी ७५ टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेला आहे. यामध्ये विशेष प्राविण्यासह १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ९९ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीमध्ये यश मिळवून घवघवीत यश संपादन केलेले आहे. त्याबद्दल जेएसपीएम संस्थेचे उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर यांच्याहस्ते गुणवंतांना सन्मानित करण्यात आले. यावेळी जेएसपीएमचे समन्वयक संचालक निळकंठराव पवार, फायनांन्स डायरेक्टर बापूसाहेब गोरे, समन्वयक संचालक विनोद जाधव, प्राचार्य गोविंद शिंदे, मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, उपप्राचार्य प्रभाकर अंकुश, सुप्परवायजर प्रा.सुचिता घाडगे, प्रा.सुरेश सुडे, प्रा.मनाळे, प्रा.मोमले, प्रा.माडीबोणे यांच्यासह प्राध्यापक व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# लातूर शहरात बुद्ध जयंती सोहळा उत्साहात

लातूर / प्रतिनिधी- शांतीचे अग्रदुत, महाकारूणीक, विश्ववंदनीय तथागत गौतम बुध्दांचा जन्म वैशाख पौर्णिमेला इ.स. पूर्व ५६३ मध्ये झाला. शील, सदाचार, करूणा, मैत्री आणि शांततेची शिकवण हे भगवान बुध्दांचे व्यावहारिक व आध्यात्मिक तत्वज्ञान असुन समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि सामाजिक न्याय तथागत बुध्दांचा समग्र जगाला वैश्विक संदेश आहे. भगवान बुध्द संपूर्ण आशिया खंडाचे दिपस्तंभ च ठरले आहेत. समाजास बुध्दीप्रामाण्यवादी, विज्ञानवादी आणि सुसंस्कारी बनवने हे बुध्द शिकवणीचे ध्येय आहे. अशा या भारताच्या महत्तम युगप्रवर्तक महामानव ठरलेल्या तथागत भगवान बुध्दांची जयंती आज जगभरात मोठ्या उत्साहात साजरी होतांना लातूर शहरातही मोठया उत्साहात पु. भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांच्या सौजन्याने तथागत बुद्ध जयंती साजरी करण्यात आली.





कार्यक्रमाच्या सुरुवातीस भंते बुद्धशील यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पंचशील धम्मध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी धम्मसंदेश रॅली काढण्यात आली. या वेळी हजारोच्या संख्येने बौद्ध उपासक, उपासिका शुभ्र वस्त्र परिधान करून सहभागी झाले होते. या धम्मसंदेश रॅलीमध्ये समता सैनिक दलाचीही परेड झाली. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती मंडळातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अपर्ण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. पु. भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. त्रिशरण पंचशीलानंतर शुभेच्छापर बोलताना भिक्खु पय्यानंद थेरो यांनी सर्व भारतीयांना बुद्ध जयंतीच्या शुभेच्छा दिल्या व धम्मसंदेश रॅलीचा समारोप करण्यात आला.


यावेळी केशव कांबळे, विनोद खटके, भिमराव चौदंते, सुजाता अजनीकर, प्रा. देवदत्त सावंत, सुशील चिकटे, कुमार सोनकांबळे, जि.एस. साबळे, शोभा सोनकांबळे, वसंत वाघमारे, पांडुरंग अंबुलगेकर, साधू गायकवाड, लाला सुरवसे आदीसह मोठया संख्येने उपासक उपासिका उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती मंडळाचे जितेंद्र बनसोडे, असित कांबळे, रमक जोगदंड, आनंद सोनवणे, राहुल डुमने, विजय चौधरी, सिद्धार्थ सूर्यवंशी, करन ओव्हाळ, विनोद कोल्हे, राजू सूर्यवंशी, राहुल शाक्यमुनी, अशोक कांबळे, ज्योतीराम लामतुरे, अनिरुद्ध बनसोडे, अरुण कांबळे, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, उदय सोनवणे, मिलिंद धावारे यांनी परिश्रम घेतले.

# अनुवादामुळे रात अभी बाकी है हा काव्यसंग्रह राष्ट्रीय स्तरावर आला आहे

## राष्ट्रीय कविता महोत्सवात डॉ. सुखदेव सिंग सिरसा यांचे प्रतिपादन

कोझीकोडे केरळ (विशेष प्रतिनिधी )- आपला देश हा विविधतेने नटलेला आहे. अनेक भाषा अनेक संस्कृती हे त्याचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे आपल्याकडे अनुवादाला फार महत्त्व आहे. वेगवेगळ्या प्रादेशिक भाषेतील कवितासंग्रहाचेच नव्हे तर एकूणच विविध भाषेतील साहित्याचा अनुवाद व्हायला पाहिजे. कारण अनुवादामुळे साहित्य हे राष्ट्रीय स्तरावर पोहोचते. रात अभी बाकी है हा अनुवादित काव्यसंग्रह आता राष्ट्रीय स्तरावर येणार आहे. असे प्रतिपादन डॉ. सुखदेव सिंग सिरसा यांनी केले.

डॉ. रचना यांनी हा अनुवाद एवढ्या सहजतेने केला आहे की आपण मूळ कविताच वाचत आहोत असे वाटते असेही उदगार त्यांनी काढले. केरळ येथील कोझीकोडे शहरातील



पार्क रेसिडेन्सी या सभागृहात राष्ट्रीय कविता महोत्सवास प्रारंभ झाला. शनिवार दिनांक १८ मे रोजी पहिल्या सत्रात रात अभी बाकी है या कवितासंग्रहाचे प्रकाशन झाले. प्रसिद्ध पंजाबी साहित्यिक व साहित्य अकादमीचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव सिंग सिरसा यांचे शुभ हस्ते या कवितासंग्रहाचे प्रकाशन झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध मल्याळम लेखक डॉ. शिवनकुट्टी, आदिवासी बोलीचे अभ्यासक सुनील गायकवाड कवी देविदास फुलारी, अनुवादक डॉ. रचना यांची उपस्थिती होती देविदास फुलारी यांच्या रात्र भरात आहे या मराठी कविता संग्रहाचा हिंदी भावानुवाद डॉ. रचना यांनी केला असून साहित्याक्षर प्रकाशनाच्या क्रांती राऊत यांनी हा प्रकाशित केलेला आहे.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. संजय बोरुडे यांनी प्रास्ताविक केले. कवी देविदास फुलारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले . ते म्हणाले की युनानो मिश्र रोमा सब मिट गये जहाँ से मगर कुछ बात है की हस्ती मिटती नही हमारी या भारताच्या अखंडते मध्ये विविध भाषांचा आविष्कार हा सुद्धा अखंडतेचे प्रतीक म्हणून उभा आहे. डॉ रचना यांनी या कवितासंग्रहाच्या अनुवादाविषयी आपले मत व्यक्त केले. मल्याळम लेखक डॉ. शिवन कुट्टी म्हणाले की रात अभी बाकी है हा हिंदी अनुवाद असल्याने इतर भाषेत हा कवितासंग्रह अनुवादित होण्याच्या वाटा मोकळ्या झालेले आहेत या कार्यक्रमाचे सूत्र संचालन आशा डांगे यांनी केले तर डॉ रचना यांनी आभार मानले यावेळी मंगला फुलारी, मनीषा पाटील, बापू दासरी, मुक्ता धनपलवार, महेश मोरे, पुष्पा नरवाडे, मनीषा रायजादे प्रणिता तेली, डॉ जयसिंग गाडेकर , मनिषा घेवडे , सुजाता भोजने , सुधीर शेरे , डॉ. स्वाती पाटील डॉ . प्रवीण काळे, डॉ. विठ्ठल जाधव इत्यादी मान्यवरासह अनेक साहित्यिक श्रोते उपस्थित होते.

# बुद्धाची भूमी म्हणून भारताची जगभरात ओळख:केशव कांबळे



**लातूर / प्रतिनिधी-** २५६८व्या बुद्धजयंती निमित्तानं वैशाली बुद्धविहार बौद्धनगर लातूर येथे धम्मध्वजारोहण व सामुदायिक बुद्धवंदनेचाकार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सुर्यभान लातूरकर,दामु कोरडे,अशोकराव सातपुते,जगन्नाथ सुरवसे,यांचे हास्ते भ. बुद्धाच्या प्रतिमेस व डा बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प-धुप-दिपाने पुजा करण्यात आली तर सुर्यभान लातूरकर यांचे हास्ते धम्म ध्वजारोहण करण्यात आले.

या प्रसंगी बोलताना केशव कांबळे म्हणाले की ,बुद्ध हा भारताचा भुमीपुत्र आहे.सिद्धार्थ गौतमाने राजवैभवाचा त्याग करुन समाजात आसणार्या कलहा वर लक्ष केंद्रित करुन माणसा-माणसातला कलह कसा नष्ट होईल ? याविचाराने चित्ताची एकाग्रता साधुन वैशाख पौर्णिमेला नव्या ज्ञानाची प्राप्ती करुन ते सम्यक सम्बुद्ध झाले. माणुस केंद्रबिंदु माणुनमाणसाचं मन प्रधान आहे. त्या मनाला निर्मळबनवणारे तत्वज्ञान भ.बुद्धाने सांगितले .माणसातील राग ,लोभ,द्वेष हे विकार मानव जातीला नाशाकडे घेवुन जातात तर प्रेम ,करुणा,शांती ,बंधुत्वाचा विचारमाणसाला श्रेष्ठत्व बहालकरतात. समतेमुळे माणुस जोडला जातो तरविषमतेने माणुस माणसापासुन तोडला जातो,म्हणुनसमताधिष्ठीत समाजरचनाहि बुद्धाची जगाला देण आहे. याचमहान तत्वज्ञानाकडे जग आकर्षित झाले म्हणुन आज भारतालाजग बुद्धाचीभुमी म्हणुन ओळखते. आसे मनोगत व्यक्त केले. शेवटी धम्मपालन गाथेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# बॉयलरचा तुकडा दीड किमी उडून कारवर पडला

ठाणे,२३ - दुपारच्या दरम्यान डोंबिवलीमध्ये झालेल्या एका स्फोटामुळे सगळेच हादरून गेले. डोंबिवली एमआयडीसीतील एका केमिलक कंपनीतील स्फोट झाल्याची घटना घडली. हा स्फोट इतका भयंकर होता की त्याच्या बॉयलर्सचे तुकचे दीड किमीपर्यत उडाले आणि आजूबाजूच्या सोसायट्यांच्या काचाही फुटल्या.

भूकंप झाल्याची लोकांना भीती डोंबिवली एम आयडीसीतील कंपनीत झालेल्या स्फोटामुळे दीड किलोमीटरमधील गाड्यांच्या आणि बिल्डिंगच्या काचा फुटल्या आहेत. एखादा भयंकर भूकंप झाल्याप्रमाणे लोक भीतीने पळत होते. आजुबाजूच्या परिसरातील एकाही सोसायटीच्या काचा राहिलेल्या नाहीत, सगळ्या काचा फुटून गेल्या आहेत. यामुळे अनेक लोक जखमी झाले आहेत. मोठी मनुष्यहानी झाली असावी अशी शक्यताही वर्तवण्यात येत आहे.

बॉयलर्सचे जे तुकडे उडाले ते दीड किलोमीटर अंतरावर पडले आहेत. हे तुकडे चारचाकी गाड्यांवर पडून गाड्या दबल्या आहेत, अशी माहिती स्थानिक रहिवाशी संजय चव्हाण यांनी दिली. डोंबिवलीतील स्फोटाची तीव्रता एवढी होती की, डोंबिवली एमआयडीसी भागात दीड ते दोन किलोमीटर लांबच्या सोसायटीतील बिल्डिंग बाहेर एक कार उभी होती, त्या कारवर बॉयलरचा तुकडा जाऊन पडला. त्यामुळे कारचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालंय. डोंबिवली एम आयडीसी रहिवासी विभागात अनेक इमारतींच्या काचा फुटल्या आहेत. कंपनीला लागलेल्या या स्फोटामुळे आजूबाजूच्या कंपन्यांनाही आग लागल्याची माहिती समोर येत आहे. सध्या अग्निशमन दलाकडून आग नियंत्रण आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. एम आयडीसीच्या आजुबाजूच्या परिसरात स्फोटाच्या हादऱ्याने पडझड झाल्याचे दिसत आहे. डोंबिवली एमआयडीसीतील कंपनीच्या परिसरात धुराचे लोट आणि आगीची तीव्रता इतकी जास्त आहे की, अग्निशमन दलाच्या जवानांना कंपनीच्या गेटवरुनच पाण्याचा मारा करावा लागत आहे. कंपनीत अजूनही रसायनांचे अनेक ड्रम आहेत. आगीमुळे या ड्रमचा स्फोट होत आहे. त्यामुळे आग कमी होताना दिसत नाही. आगीची धग कमी झाल्याशिवाय अग्निशमन दलाला आतमध्ये शिरता येणे शक्य नाही. कोणतीही जीवितहानी नाही डोंबिवलीतील एमआयडीसी स्फोटानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी म्हटले की, घटनास्थळी रेस्क्यू टीम, जिल्हाधिकारी आणि खासदार पोहोचले आहेत. सध्या तेथील परिस्थिती नियंत्रणात आहे.या दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

# उरुळी कांचनजवळील कालव्यात चारचाकी कोसळली

पुणे,२३ - उरुळी कांचन जेजुरी रस्त्यावर शिंदवणे गाव हद्दीत कार चालकाचे कारवरील नियंत्रण सुटून नवीन बेबी कालव्याचा लोखंडी कठडा तोडून कार गाडी पाण्यात पडली. या घटनेत एकाचा जागेवर मृत्यू झालाय. तर अन्य तिघे जखमी झालेत. हा अपघात गुरुवारी (२३ मे) सकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास घडला. अपघातात अमर साहेबराव घाडगे (वय २८ रा.जुन्नर) या कार चालकाचा जागीच मृत्यू झाला. तर गणेश संजय थोरात (वय २२) आणि शुभम शंकर इंगोले (वय २१, रा. दोघंही केसनंद ता. हवेली) आणि आदित्य महादेव तावरे (वय २० रा.जुन्नर) अशी जखमी झालेल्या तिघांची नाव आहेत. तर गाडी कोसळल्याची माहिती मिळताच शेजारी राहणाऱ्या नागरिकांनी तात्काळ मदत केली. घटना घडल्यानंतर सदर ठिकाणी तब्बल दीड ते दोन तासांनी दोन पोलीस कर्मचाऱ्यांनी हजेरी लावली असल्याचं काही नागरिकांनी सांगितलं. तर याप्रकरणी पुढील कार्यवाही सुरू आहे.

# धम्माचे आचरण म्हणजे खरी राष्ट्रभक्ती होय : प्रा बालाजी आचार्य

## अहमदपूर येथे तथागत बुद्ध पोर्णिमेनिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न

अहमदपूर (करामुंगीकर ) आज देशांमध्ये अज्ञान आणि अंधश्रद्धे मध्ये वाढ झाली आहे यामुळे देशापुढे अनेक जटील समस्या निर्माण झाल्या असून मनुष्याचे जीवन अधोगतीकडे जात आहे ही परिस्थिती बदलायची असेल तर धम्मशिवाय पर्याय नाही कारण धम्म म्हणजे विज्ञान ,बुद्धिवाद आणि नीतिमता होय तसेच धम्माचे आचरण म्हणजे खरी राष्ट्रभक्ती होय असे प्रतिपादन प्रा बालाजी आचार्य यांनी वैशाख पौर्णिमेनिमित्त तथागत सम्यक समबुद्ध यांच्या जयंतीनिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर तथागत बुद्ध विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला विनम्र अभिवादन करताना केले.

अहमदपूर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक युवक मंडळ ,अरुणभाऊ भाऊसाहेब वाघंबर आयोजित तथागत बुद्ध यांची २५६८ वी जयंती अति उत्साहात संपन्न करण्यात आली



यावेळी प्रा आचार्य बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिपाईचे लातूर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे हे होते तर प्रमुख पाहुणे आमदार बाबासाहेब पाटील ,प्रमुख मार्गदर्शक प्रा बालाजी आचार्य ,राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष शिवानंद हेंगणे, महेश अर्बन बॅंकेचे उपाध्यक्ष निवृत्तीराव कांबळे , सामाजिक नेते दयानंद वाघमारे , धम्मउपासक शेषराव ससाने , चाकूरचे प्रथम नगराध्यक्ष मिलिंद महालिंगे, माजी नगराध्यक्षा सरस्वती कांबळे , सामाजिक नेते प्रकाश फुलारी ,प्रभाकर गायकवाड ,नागसेन महालिंगे मयूर कांबळे, संदीप महालिंगे, सुर्यकांत कोकाटे , भाजपाचे गोविंदराव गिरी ,पत्रकार बाबासाहेब वाघमारे ,त्रिशरण मोहगावकर, भीमराव कांबळे आयोजक अरुणभाऊ भाऊसाहेब वाघंबर आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी तथागत बुद्ध यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या शुभहस्ते करून आ बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात आले .

त्यानंतर त्रिशरण ,पंचशील ग्रहण करून महामानवास विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी आ बाबासाहेब पाटील यांनी सम्यक शुभेच्छा देताना बुद्धाचे तत्त्वज्ञान सर्वांसाठी उपयुक्त आहे असे सांगून बुद्ध पौर्णिमेच्या सदिच्छा दिल्या यावेळी प्रा बालाजी आचार्य पुढे बोलताना म्हणाले की प्रज्ञा ,शील करुणेची आणि सदाचरणाची शिकवण देऊन कर्म सिद्धांत द्वारे मानवाला दुःखमुक्तीचा मार्ग तथागताने दाखविला त्या मार्गाचे अनुसरण केले तर आपले जीवन समृद्ध होईल असे सांगून राष्ट्राच्या उभारणीत धम्माचे अनन्य साधारण असे महत्व आहे असे ही म्हणाले तत्पूर्वी अरुणभाऊ वाघंबर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दयानंद वाघमारे यांनी केले तर आभार सचिन गायकवाड यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बाबासाहेब वाघमारे , शुभम वाघंबर ,आकाश व्यवहारे , बाबुभाई शेख , अंजलीताई वाघंबर , मुन्ना पठाण , चॉद शेख शकुंतला बनसोडे ,रसिका बनसोडे , नगर परिषदेचे कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.

# परमेश्वराची भक्ती केल्याने संकट दुर पळतात :हभप निवृत्ती महाराज जांभळवाडीकर



शिरूरआनंतपाळ:संसारामध्ये आनंद मिळवण्यासाठी प्रत्येक जन पैसा कमावत असतो. परंतु शांती मिळवण्यासाठी प्रत्येकाला भगवंताची भक्तीच करावी लागते असे प्रतिपादन ह.भ.प निवृत्ती महाराज जांभळवाडीकर यांनी व्यक्त केले.

लातुर जिल्ह्यातील हानमंतवाडी येरोळ येथे हनुमान मंदिरावर आयोजीत केलेल्या अंखड हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याच्या किर्तनाने झाली. त्यावेळी निवृत्ती महाराज जांभळवाडीकर यांचे किर्तन झाले. पुढे महाराज निरुपण करताना म्हणाले की, भगवंताची भक्ती केल्याने मनुष्याला सर्व कार्यामध्ये यश मिळत असते. काही प्रसंगी घरातील सदस्यावर दु:ख संकट येत असतात. त्यामुळे आपणास दिवसभराच्या कामातुन मिळालेल्या वेळामध्ये इतर लोकांची निंदा न करत बसता सतत भगवंताचा नाम उच्चार केलो तरी देखील आपल्या घरातील आलेल्या संकट दुर होऊन घरात सुख शांती लाभते असे महाराज म्हणाले. या सप्ताहामध्ये अनेक नामवंत महाराजाची दररोज संध्याकाळी किर्तणे झाली. सप्ताहाच्या सांगता दिवशी गावातील महिला पुरुषांनी ज्ञानेश्वर माऊलीचा ग्रंथ डोक्यावर घेऊन ज्ञानेश्वर माऊलीचा जय घोष करत गाव प्रदक्षिणा घातली. काल्याचा किर्तनाला येरोळ, सताळा, वायगाव, डिगोळ, सुमठाणा, जांभळवाडी, नागेवाडी, बोळेगाव, दैठणा, कारेवाडी व बावलगाव पंचक्रोशीतील भावीक भक्त उपस्थित होती. महा प्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

यशवंत धाराशिव जिल्हा
शुक्रवार दि. २४ मे २०२४
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com



## विद्युत वितरण कंपनीच्या कारभारावर नागरिकांची तीव्र नाराजी

परंडा दि.२३ (प्रतिनिधी) - येथील विद्युत वितरण कंपनीच्या मनमानी कारभारामुळे तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. गेल्या एक महिन्यापासून वेळोवेळी वीज पुरवठा खंडीत होत आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे वीज पुरवठा बंद झाल्यावर वयोवृद्ध नागरिकांना आपला जीव मुठीत धरुन बसवा लागत आहे. महत्त्वाचे म्हणजे वीज कधी येईल ? अशी विचारणा करायची तर वीज कंपनीचा फोन नेहमीच बंद असतो. दुर्दैवाने जर शहरात एखादी दुर्घटना घडली तर कुठे फोन करून सांगावे ? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. वीज कंपनी नेहमीच बील दरवाढ करते, पण तशा सुविधा देत नसल्यामुळे तालुक्यातील नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

तसेच या महावितरण कंपनीमध्ये असलेले वरिष्ठ अधिकारी व कनिष्ठ कर्मचारी हे परंडा शहरात राहत नसून आपल्या सोयीनुसार येऊन परंडा तालुक्यातील वीज कंपनीचा कारभार चालवित आहेत. त्यामुळे महावितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अचानकपणे परंडा येथे येऊन पाहणी करावी व जे अधिकारी मुख्यालयी राहत नाहीत त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी. तसेच दरमहा वापरलेल्या वीज मीटरचे रीडिंग घेणे आवश्यक असताना ते घेतले जात नसल्याच्या तक्रारी आहेत. तर दरमहा बिलाचे वाटप व्यवस्थितपणे केले जात नाही. त्यामुळे महावितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देवून परंडा तालुक्यातील महावितरणचा कारभार सुधारवा अशी मागणी होत आहे.

# महापुरुषांच्या पुतळ्याजवळ वाढणारी गर्दी महापुरुषांच्या पुस्तकाजवळ आणणे गरजेचे - चंदनशिवे

धाराशिव दि.२३ (प्रतिनिधी) - पाच हजार वर्षांपासून दलित, बहुजन समाज अन्याय अत्याचार सहन करीत आला. त्यांना न्याय देण्यासाठी कोणीच पुढे येत नव्हते. परंतू १४ एप्रिल १८९१ साली डॉ बाबासाहेब आंबेडकर नावाचा तळपता प्रज्ञा सूर्य उगवला. त्यांनीच सर्व अन्याय अत्याचार गाडून टाकण्याचे काम करीत सर्वानाच न्याय देण्याचे काम केले.

त्यानंतर आंबेडकरी चळवळ मोठ्या जोमाने वाढली. मात्र आजकालची तरुण मंडळी चळवळीत दिसत नसून ते फेसबुक, व्हाट्स प यावरती मग्न दिसत आहेत. त्यामुळे डिजिटल कट्टरता वाढलेली असून ही धार्मिक रंगांची चळवळ घातक आहे. प्रत्येकजण आपापल्या सोयीने भगवा, निळा, पिवळा, हिरवा, लाल व इतर रंगांत शुभ सकाळ असा संदेश पाठवित आहेत. या माध्यमातून महापुरुषांच्या पुतळ्याजवळ मोठ्या प्रमाणात गर्दी वाढली असून ती गर्दी महापुरुषांच्या पुस्तकाजवळ आणणे गरजेचे असल्याचे ठाम प्रतिपादन विद्रोही कवी नितीन चंदनशिवे यांनी दि.२२ मे रोजी केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार मंचच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेत पुरोगामी चळवळ आणि आजचा युवक या विषयावर ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धाराशिव जिल्हा परिषदेचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जरिचंद सावंत उपस्थित होते. पुढे बोलताना कवी चंदनशिवे म्हणाले की, वामनदादा कर्डक यांच्या विचाराशिवाय आंबेडकरी होऊ शकत नसल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे फुले, शाहू, आंबेडकर यांचे विचार जी माणसे जपतात व सांगतात, त्यांच्या घराची राख होते. तर जी माणसे फुले शाहू आंबेडकर यांचे विचार विकतात त्यांच्या घराचे सोनं होते. मात्र राख झालेल्यांचाच इतिहास लिहिला जातो, सोनं झालेल्यांचि इतिहास लिहिला जात नसल्याचे त्यांनी सांगितले. तर चळवळ ही राजकीय पुढारी किंवा पक्षामुळे जिवंत राहिली नसून ती शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा झोपडीत राहणाऱ्या कार्यकर्त्यांमुळे जिवंत असल्याचे त्यांनी नमूद केले. तर सध्या राजकारणी मंडळी व त्यांच्या नकली कारभारामुळे सर्वत्र नकली वातावरण असून या नकली वातावरणात चांगल्या लोकांना निराशेची झालर आली आहे. मात्र नकली वातावरणामध्ये फुले, शाहू, आंबेडकर व संविधान हे असली असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले. तसेच माणसाने माणसात राहिले पाहिजे असे सांगत ते म्हणाले की, सध्या दोन भारत देश आहेत. एक देश खाल्लेले पचवायला व जिरवायला तर दुसरा उपाशी पोटीचा देश असून तो भाकरीच्या शोधात असल्याचे सांगत त्यांनी येथील सर्वसामान्यांना राजकारण्यांकडून कशा प्रकारे नागवले जात आहे ? यावर जळजळीत प्रहार केला.


पँथरच्या काळात आंबेडकरी चळवळीत हंबरडा असल्याने ती जोमाने वाढली व फोफावली. मात्र त्यानंतरच्या काळात चळवळीत असणारा हंबरडा दिसत नसल्याने तो पुन्हा दिसला पाहिजे. त्यासाठी जुन्या लोकांनी खुर्च्या सोडायला पाहिजेत. तरच नवतरुण पुढे येतील असे सांगत महापुरुषांच्या जयंत्या साजरा करण्यासाठी महिलांच्या हाती सूत्रे सोपवावीत असे आवाहन त्यांनी केले. सर्वच क्षेत्रात अध्यक्ष सर्व काही असल्यामुळे उपाध्यक्षांना काहीच किंमत नसते. असाच प्रकार राज्याच्या राजकारणात झाला असून उपमुख्यमंत्री असलेल्या मंडळींना पुन्हा कधीच मुख्यमंत्री होता येणार नाही असा टोला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांना लगावला. जोपर्यंत गावागावात कार्यकर्ता जिवंत आहे तोपर्यंत चळवळ जिवंत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी जरिचंद सावंत यांनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी भाई उद्धवराव पाटील विचार मंचचे भाई धनंजय पाटील, मध्यवर्ती शिवजयंतीचे अध्यक्ष अमरसिंह देशमुख, शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे सौरव बागल, अंजुमन सोसायटीचे फिरोज पल्ला, रमाई फाऊंडेशनचे पृथ्वीराज चिलवंत,



शाहू नगर उत्सव अभिवादन समितीचे सौरव शिंगाडे, दादासाहेब शिंगाडे, कवयित्री भाग्यश्री केसकर, कवी पंडित कांबळे, व्ही एस गायकवाड, बाळासाहेब मस्के आदींना विचार मंचच्यावतीने प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी समितीचे सचिव प्रा महेंद्र चंदनशिवे, पंडित कांबळे, नागनाथ गोरसे, प्रा अंबादास कळासरे, मारोती पवार, अमोल गडबडे, बाबासाहेब जानराव, अभिमन्यू इंगळे, दीपक सरवदे, रोहिदास झेंडे, व्ही एस गायकवाड, चंद्रकांत मस्के, मिलिंद जानराव, दत्तात्रय लांडगे, मारुती अहिरे, हनुमंत गायकवाड, दीपक कांबळे, अनुरथ नागटिळक, बाळासाहेब वाघमारे, बाबासाहेब मनोहर, पंडित माने, सुमित कांबळे, विजय दनाने, श्रीकांत हावळे यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक प्रा रवी सुरवसे यांनी तर सूत्रसंचालन राजेंद्र अंगरखे व उपस्थितांचे आभार प्रा अंबादास कळासरे यांनी मानले. या कार्यक्रमास महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फुले शाहु आंबेडकर उद्यान कृती समितीच्यावतीने बुध्द पौर्णिमा साजरी



धाराशिव दि.२३ (प्रतिनिधी) - जगाला शांततेचा संदेश देणारे विश्व शांतीदुत तथागत गौतम बुद्ध यांची २५८६ वी जयंती बुध्द गुफा देखाव्यात बुद्ध पिंपळ वृक्षाखाली (बोधी वृक्ष) ध्यानस्थ बसलेल्या भूमी स्पर्श गौतम बुद्ध यांच्या मुर्तीस समितीच्या पदाधिकाऱ्यांसह शहरवासियांनी अभिवादन केले.

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन सामुदायिक त्रिशरण घेण्यात आले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेच्या विद्यामाला धावारे, शिलाताई चंदनशिवे, मीनाताई लगाडे, बनसोडे, वनमाला धावारे, विद्याताई वाघमारे, जयश्री चव्हाण अंकुश उबाळे, गुणवंत सोनवणे, बाबासाहेब बनसोडे, धनंजय वाघमारे, गणेश वाघमारे, संजय गजधने, संग्राम बनसोडे, बलभीम कांबळे, संपतराव शिंदे, विद्यानंद वाघमारे, रमेश कांबळे, स्वामीनाथ चंदनशिवे, अतुल लष्करे, मेसा जानराव, पुष्पकांत माळाळे, नितिन बनसोडे, मुकेश मोटे, स्वराज जानराव, विशाल घरबुडवे, श्रीकांत गायकवाड, बाबासाहेब जानराव, विद्यानंद वाघमारे, राजाराम बनसोडे, सोहन बनसोडे, अमोल लष्करे, बाबा कांबळे आदी उपस्थित होते.

### कर्करोगविरोधी औषध ओलापरिब टॅब्लेट मागे घ्या

नवी दिल्ली : ड्रग कंट्रोलर जनरल ऑफ इंडिया- डीसीजीआयने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील औषध नियामकांना, तीन किंवा अधिक वेळा केमोथेरपी दिलेल्या रुग्णांच्या उपचारांसाठी ॲस्ट्राझेनेकाचे कर्करोगविरोधी औषध ओलापरिब गोळ्या परत मागवण्याचे निर्देश दिले आहेत.

संभाव्य प्रतिकूल परिणामांमुळे, जीबीआरसीए उत्परिवर्तन आणि प्रगत गर्भाशयाचा किंवा स्तनाचा कर्करोग असलेल्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी उत्पादकाने या औषधाचे विपणन करणे थांबवले आहे, याची खात्री करण्यासाठी राज्य नियामकांना निर्देश दिले आहेत. ड्रग रेग्युलेटरच्या मते, इतर मंजूर लक्षणांसाठी औषधाची विक्री सुरू ठेवली जाऊ शकते. १६ मे रोजी नियामकांना पाठवलेल्या पत्रात, डीसीजीआयने सांगितले की फर्म ॲस्ट्राझेनेका फार्मा इंडियाने त्यांना ओलापरिब टॅब्लेट मागे घेण्यासाठी अर्ज सादर केला आहे. यासाठी फर्मने काही क्लिनिकल पुरावेही सादर केले.

## कृषी विभागामार्फत बीज प्रक्रिया प्रात्यक्षिकाद्वारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

उमरगा दि.२३ (प्रतिनिधी) - फळबाग लागवड, शेततळे यासाठी ऑनलाईन अर्ज करावे असे आवाहन कृषी विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, उपविभागीय कृषी अधिकारी महादेव असलकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यामध्ये बीज प्रक्रिया व बियाणे उगवण क्षमता तपासणी याबाबत जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. उमरगा तालुक्यामध्ये तालुका कृषी अधिकारी डी बी रितापुरे यांनी खरीप हंगामामध्ये प्रत्येक गावात बीज प्रक्रिया व बियाणे उगवण क्षमता तपासणी प्रात्यक्षिकच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याचे नियोजन केले




आहे. त्यानुसार गाव स्तरावर कृषी विभागाचे कृषी सहाय्यक व उमेद अंतर्गत महिला गटांचे प्रतिनिधी यांच्या समन्वयातून गावोगावी बियाणे उगवण क्षमता तपासणी व बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक मोहीम राबविण्यात आलेली आहे.

दि. २३ मे रोजी उमरगा तालुक्यातील धाकटीवाडी येथे खरीप हंगामपूर्व बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी बैठकीमध्ये उपस्थित शेतकऱ्यांना पेरणीसाठी सोयाबीनचे घरचे बियाणे वापर करणे, बियाण्याची उगवण क्षमता तपासणी प्रात्यक्षिक, सोयाबीन बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक, माती तपासणी, जमीन आरोग्य पत्रिकेच्या आधारे संतुलित खताचा वापर करणे, रुंद सरी वरंबा पद्धतीने (बीबीएफ) सोयाबीन पेरणी करणे, गोगलगाय नियंत्रण व उपाय योजना, MREGS अंतर्गत फळबाग लागवड, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना, शेततळे, पीक प्रात्यक्षिकासाठी ऑनलाईन करणे ,अनुदानावर प्रमाणित बियाणांसाठी ऑनलाईन करणे, कृषी मालावर प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी PMFME योजना, महाडीबीटीवरील सर्व कृषी विभागाच्या योजना या विषयी सविस्तर मार्गदर्शन कृषी सहाय्यक पी व्ही काळे यांनी केले.

या कार्यक्रमासाठी मंडळ कृषी अधिकारी डी.व्ही. मुळे, सरपंच श्रीकांत चेंडकापुरे, पोलीस पाटील संजीव चेंडकापुरे यांच्यासह प्रगतशील शेतकरी, महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पद्मश्री डॉ. विकास महात्मे एम्सच्या अध्यक्षपदी



धाराशिव दि.२३ (प्रतिनिधी) - ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेसचे (एम्स) चे नवे अध्यक्ष म्हणून पद्मश्री डॉ. विकास महात्मे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. काही महिन्यांपूर्वीच डॉ. प्रशांत जोशी यांची एम्स नागपूरचे कार्यकारी संचालक म्हणून नियुक्ती झाली होती. डॉ. महात्मे यांच्याकडे अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

त्यामुळे आरोग्यक्षेत्रातील या महत्त्वाच्या संस्थेतील दोन प्रमुख पदांवर पहिल्यांदाच नागपूरकर विराजमान झाले आहेत. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने डॉ. महात्मे यांची नियुक्ती केली आहे. माजी राज्यसभा सदस्य असलेले डॉ. महात्मे यांचे सामाजिक आरोग्यसेवेत मोठे योगदान आहे. रुग्णसेवेप्रतीची बांधिलकी आणि आरोग्यसेवेतील त्यांचा व्यापक अनुभव एम्सच्या ध्येयासाठी पूरक ठरणारा असल्याचे बोलले जात आहे. या नव्या जबाबदारीला आपण पूर्ण न्याय देऊ, असे डॉ. महात्मे यांनी सांगितले. या नेमणुकीबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडविया, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे त्यांनी आभार मानले आहेत.

नेत्रोपचाराच्या क्षेत्रात डॉ. महात्मे यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून भारत सरकारने त्यांना पद्मश्रीने सन्मानित केले आहे. आजपर्यंत एम्स नागपूरचे अध्यक्षपद दिल्लीचे डॉ. पी.के. दवे यांच्याकडे होते. आता सरकारने नागपूरकर असलेल्या डॉ. महात्मे यांची त्या पदावर नियुक्ती केली आहे. २०१८-२०१९ या सत्रात मेडिकल परिसरातून एम्सचा प्रारंभ झाला होता. आता मिहानमधील विस्तीर्ण परिसरात आधुनिक तंत्रज्ञानासह एम्स नागपूर रुग्णसेवा देत आहे. याबद्दल माजी रेशीम संचालक डॉ कलंत्री, कॅप्टन कलंत्री, कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे माजी प्राणी शास्त्र प्रमुखडॉ अधिकराव जाधव, आय वॉच फार्मर प्रोड्युसर कंपनीचे अध्यक्ष बालाजी पवार यांनी अभिनंदन केले आहे.

## पालकांनी तरुण पिढीला व्यसनाधीनतेपासून दूर ठेवले पाहिजे - वाघमारे


### श्रामनेर संघाची पिंपरी येथे चारिका व धम्मदेसना

धाराशिव (प्रतिनिधी) - तरुण पिढी विविध प्रकारच्या व्यसनाच्या आहारी जात आहे. हे स्वतःसह इतरांना देखील विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः कुटूंब उध्वस्त होत असून भावी पिढी चे भवितव्य धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे तरुण पिढीला व्यसनाधीनतेपासून दूर ठेवले पाहिजे असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे वरिष्ठ केंद्रीय शिक्षक (नांदेड) पी.एन. वाघमारे यांनी दि.१९ मे रोजी केले.

दि बुद्धीस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने स्मृती बुद्ध विहार भीम नगर धाराशिव येथे श्रामनेर शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या श्रामनेर शिबिराच्या माध्यमातून धम्म साहित्य, संस्कार शिक्षण, बौद्ध धर्म, परिवर्तनवादी महापुरुषांचा इतिहास, चळवळ व बौद्ध तत्त्वज्ञानाच्या अनुषंगाने शिक्षण प्रशिक्षण चारिका आणि धम्म प्रचार करण्यात येत आहे. चारिकेच्या अनुषंगाने श्रामनेर संघाने धाराशिव तालुक्यातील पिंपरी येथे भेट दिली. त्यावेळी बोलताना वरिष्ठ शिक्षक वाघमारे म्हणाले की, जगामध्ये बौद्ध तत्वज्ञान सर्व सृष्टीला उपयुक्त ठरलेले आहे. त्यामुळेच सर्व जग आज तथागत गौतम बुद्धाला आपलेसे करून त्यांचे तत्त्वज्ञान आत्मसात करण्याचा प्रयत्न करीत आहे. विशेष म्हणजे जगाच्या विविध भागात युद्ध सुरू असून ज्यांना याची झळ बसलेली आहे असे कट्टर बुध्द विरोधी देश देखील युद्ध नको बुद्ध हवा असा नारा देत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी केंद्रीय शिक्षक गुणवंत सोनवणे, तालुका पर्यटनचे सचिव धनंजय वाघमारे, श्रामनेर तथा संघनायक विजय बनसोडे, मोहन सपकाळ, भागवत बिडबाग, मारुती बिडबाग, किरण धाकतोडे, दशरथ बिडबाग यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

तसेच श्रद्धावान उपासक व उपासिका यांच्यावतीने साम स्नेह भोजनदान देण्यात आले. भोजनदाना नंतर श्रामनेर शिबिराचे वरिष्ठ मार्गदर्शक केंद्रीय शिक्षक पी.एन वाघमारे यांनी उपस्थितांना धम्मदेसना दिली. यावेळी बंटी बिडबाग, किरण धाकतोडे श्रद्धावान प्रविण बिडबाग, प्रशांत बिडबाग, नामदेव बिडबाग, उद्धव माने, अभिमान बिडबाग, किशोर नाईकवाडी, पवन बिडबाग, चेतन बिडबाग, अलका धाकतोडे, सोनाली धाकतोडे, साधना बिडबाग, केराबाई बिडबाग, गिता बिडबाग, पुजा बिडबाग, बुकाबाई माने, शामल बिडबाग, सुनिता सपकाळ, भाग्यश्री सपकाळ, नंदाबाई बिडबाग, मैनाबाई बिडबाग यांच्यासह बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आ. राणाजगजितसिंह पाटील यांचा आज तुळजापूर येथे जनता दरबार



धाराशिव दि.२३ (प्रतिनिधी) - जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या अडी-अडचणी व समस्या जाणून त्या सोडविण्यासाठी आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत दि. २४ मे रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजण्याच्या दरम्यान भारतीय जनता पार्टी संपर्क कार्यालय, नवीन बसस्थानक शेजारी, तुळजापूर येथे जनता दरबार आयोजित करण्यात आला आहे.

पिण्याचे पाणी, जनावरांना चारा, प्रलंबित विकास कामे, महावितरणच्या अडचणी, मनरेगाची कामे, दुष्काळी अनुदान यासह इतर अडचणींची सोडवणूक करण्यासाठी जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या काही अडचणी असल्यास भाजपा संपर्क कार्यालय, तुळजापूर येथे उपस्थित रहावे, असे आवाहन आ. पाटील यांनी केले आहे

## छत्रपती शासन ग्रुपच्यावतीने गड किल्ल्यांची साफसफाई



परंडा दि.२३ (प्रतिनिधी) - छत्रपती शासन ग्रुप हिंदूस्थान आयोजित कोकण किनारपट्टी गडकिल्ले साफसफाई स्वच्छता मोहीम क्रमांक ३६९ सिंधुदुर्ग, सर्जेकोट , देवगड, विजयदुर्ग, यंशवंतीगड, पुर्णागड , भगवतीगड , रत्नदुर्ग, जयगड, विजयगड,गोपाळगड, कनकदुर्ग, गोवागड, सुर्वदुर्गगड, बानकोट, मंडलगड, घेरा पालगड, भैरवगड सुदर्गगड, भुदरगड, समानगड, रांगनागड, लोकमान्य टिळक समाधी आदींची साफसफाई करण्यात आली आहे. यावेळी छत्रपती शासन ग्रुप हिंदूस्थान संस्थापक अध्यक्ष शिवभक्त प्राणजीत गवंडी, प्रदेशाध्यक्ष सचिन पाटील, मराठवाडा अध्यक्ष राजेंद्र विर, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष दादासाहेब तनपुरे, सोलापूर जिल्हाध्यक्ष महेश ढेरे, सिद्धेश्र्वर ढेरे, ओंकार पाटील, अशोक पाटील, अशोक ढाणे, अनिकेत ठोंबरे, आतितोश पवार, गणेश शिवदास, विजय काशीद आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## कौडगाव येथील बाल संस्कार शिबिरास प्रतिसाद

धाराशिव दि.२३ (प्रतिनिधी) - तालुक्यातील कौडगाव येथील बाल संस्कार शिबिरास बालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

धाराशिव तालुक्यातील कौडगाव येथे पाच दिवसांच्या बाल संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. प्रारंभी संताच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून पूजनाने सुरुवात करण्यात आली. यावेळी वारकरी साहित्य परिषदेचे धाराशिव तालुकाध्यक्ष हभप मोहन आप्पा वागुलकर, केज येथील माऊली वारकरी संस्थेचे अध्यक्ष हभप बाळासाहेब लाखे महाराज, सरपंच दयानंद थोरात, पिंटू नाईकवाडी, मारुती ठाकर, सुभाष गरड, भाऊसाहेब थोरात, दादा कागदे, प्रदीप थोरात, वैभव सुतार यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिरामध्ये पाच दिवस हरिपाठ, बाल कीर्तनकार यांचे कीर्तन, मृदंग वादन, हार्मोनियम वादन यांचे वर्ग घेतले जाणार आहेत. तर हभप मोहन आप्पा वागुलकर यांच्या काल्याच्या किर्तनाने होणार आहे. या कार्यक्रमास परिसरातील नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

# संपादकीय

## चला मतदानाचा उत्सव साजरा करू या!

या देशात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाने मतदान करण्याची जबाबदारी लोकशाहीच्या सर्वात मजबूत स्तंभांपैकी एक आहे. मात्र मतदान करणे सरकारने बंधनकारक केले नसले, तरी देशातील नागरिकांनी पुढे येऊन, हे कर्तव्य स्वेच्छेने पार पाडणे, ही नैतिक जबाबदारी आहे. सरकार किंवा त्यांच्या कोणत्याही धोरणाप्रति नागरिकांना नाराजी व्यक्त करण्याचा हा एक मार्ग असला, तरी मतदान हे एखाद्याचा आवाज नोंदवण्याचे एकमेव महत्त्वाचे साधन आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. देशातील नागरिकांचा आवाज किंवा जनादेश हा सत्ता बदलासाठी सर्वात मोठा आवाज असू शकतो. भूतकाळात अशी असंख्य उदाहरणे देता येतील की, देशातील नागरिकांनी काम न करणाऱ्या सरकारला घरी पाठवून देशात आवश्यक ते बदल घडवून आणण्यास भाग पाडले आहे.असे बरेच लोक आहेत, ज्यांना असे वाटते की, त्यांच्या मताने काही फरक पडत नाही आणि म्हणून ते मतदान करण्यासाठी निरुत्साहीपणा दाखवतात; किंबहुना ते स्वतःची मतदार नोंदणी देखील करत नाहीत. तथापि आपण बऱ्याचदा हे विसरतो की, एका मताचा फरक हा चांगले सरकार आणि वाईट सरकार, सक्षम आणि मजबूत व कमकुवत यांच्यातील एक फरकही असू शकतो. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने साहजिकच मतदान हे मूलभूत कर्तव्य म्हणून मानले पाहिजे. याला काही लोक गेम चेंजर पर्याय म्हणूनही संबोधतात. तसेच अशी काही प्रकरणेही असू शकतात, जेव्हा मतदाराला असे वाटते की, निवडणूक लढवणारा कोणीही उमेदवार त्याच्या किंवा तिच्या मतास पात्र नाही. अशा परिस्थितीसाठी भारताच्या निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रियेमध्ये वरीलपैकी काहीही नाही म्हणजेच नोटा हा पर्याय दिला आहे. बहुसंख्य मतदारांना असे वाटत असेल की, उमेदवार सत्तेसाठी संधी देण्यास पात्र नाहीत, तर या नोटाच्या पर्यायामुळे पुन्हा एकदा निवडणुकीची परिस्थितीही निर्माण होऊ शकते. त्यामुळे नव्या उमेदवारांसह नव्याने निवडणुका होतील. इतकी या लोकशाही देशातील जनतेच्या जनादेशाची ताकद आहे.

मतदानाचा हक्क अभिमानाच्या भावनेशी निगडित आहे, विशेषत: तरुण मतदार किंवा पहिल्यांदाच मतदान करणाऱ्यांनी विविध सोशल मीडियावर त्यांच्या शाई लावलेल्या बोटाचे चित्र शेअर करून त्यांची जबाबदारी पार पाडल्याचे दिसून येते. आपल्या पूर्वजांचा सन्मान करण्याचा हा उदात्त मार्ग आहे, ज्यांनी आपल्या राष्ट्राला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी बलिदान दिले आणि अत्यंत कष्ट घेतले. भारतीय निवडणूक आयोगाने देखील मतदार जागरूकता वाढवण्यासाठी आणि देशभरातील नागरिकांमध्ये मतदानाची गरज आणि महत्त्व वाढवण्यासाठी विविध उपक्रम सुरू केले आहेत. अशा उपक्रमांचे परिणाम वर्षानुवर्षे वाढत्या मतदानात दिसून येत आहेत, ही अभिमानाची गोष्ट आहे. चला तर मग आपणही आज याच पूर्वाश्रमीच्या आदर्शांचा अभिमान बाळगू या व मतदानाला घराबाहेर पडू या. मतदान करण्यासाठी सर्वसामान्य नागरिक मतदान केंद्रापर्यंत पोहोचू शकतात. मात्र दिव्यांग नागरिक पोहोचू शकत नाहीत. ते मतदानासारख्या कार्यापासून वंचित राहू नये म्हणून निवडणूक आयोगाने बऱ्याच तरतुदी केल्या आहेत.

मतदानाच्या दिवशी जिल्ह्यातील दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक मतदारांची मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे मोफत वाहन व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच दिव्यांग मतदारांच्या सुविधेसाठी प्रत्येक विधानसभा मतदारसंघनिहाय मोफत प्रवासासाठी दिव्यांग समन्वय अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्या आनुषंगाने जिल्ह्यातील जास्तीत जास्त दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक मतदारांनी या सेवेचा लाभ घेऊन मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

भारत निवडणूक आयोगाने दिव्यांग मतदार तसेच ८५+ वय असणाऱ्या ज्येष्ठ नागरिक मतदारांच्या सोयी-सुविधांबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. यामध्ये दिव्यांग तसेच ज्येष्ठ नागरिक यांना मतदान केंद्रावर सोयी-सुविधा पुरविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ही बाब विचारात घेऊन मुंबई शहर जिल्हा व उपनगर निवडणूक यंत्रणेमार्फत मतदानाच्या दिवशी काटेकोरपणे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार दिव्यांग आणि ज्येष्ठ मतदारांसाठी विशेष सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या मतदारांना आपल्या मतदान केंद्रापर्यंत पोहोचविण्यासाठी मतदारसंघनिहाय समन्वय अधिकारी, दिव्यांग मतदार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये दिव्यांग मतदारांकरिता एक दिव्यांग समन्वय अधिकारी याप्रमाणे दहा दिव्यांग समन्वय अधिकारी नेमण्यात आलेले आहेत. बेस्ट बस सेवा यांच्याकडून ज्येष्ठ नागरिक मतदार व दिव्यांग मतदार यांना मतदान केंद्रावर ने-आण करण्याकरिता १० लो फ्लोर बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

बेस्टच्या कर्मचाऱ्यांना मतदारसंघनिहाय नेमलेल्या दिव्यांग समन्वय अधिकारी यांचे भ्रमणध्वनी क्रमांक संपर्कासाठी देण्यात आलेले आहेत.प्रत्येक विधानसभा मतदारसंघनिहाय मतदान केंद्रानुसार बेस्ट बस सेवेच्या अधिकाऱ्यांनी मार्ग नकाशा उपलब्ध करून दिलेला आहे व त्यानुसार बस थांबे ठरवण्यात आलेले आहेत. या बस थांब्यावरून दिव्यांग व्यक्ती व ज्येष्ठ नागरिक मतदारांना या बस सेवेचा लाभ घेता येईल. तसेच लोको मोटर दिव्यांगांकरिता ५ व्हीलचेअरयुक्त लो फ्लोर बसेस व त्यासोबत एक साहाय्यक उपलब्ध करून देण्यात येत आहे.दिव्यांग मतदार व ज्येष्ठ नागरिक मतदारांना मदत करण्याकरिता एकूण १३ दिव्यांग मित्र नियुक्त केलेले आहेत. ज्या ठिकाणी म्हणजे अरुंद रस्त्यामध्ये बसेस जाणार नाही, अशा ठिकाणी प्रत्येक मतदारसंघनिहाय एक टॅक्सी म्हणजेच एकूण दहा टॅक्सी उपलब्ध करून देण्यात येत आहे. याप्रमाणे दिव्यांग मतदार व ज्येष्ठ नागरिक मतदारांना मतदान केंद्रापर्यंत ने-आण करण्याकरिता नियोजन करण्यात आलेले आहे. आज मुंबईतील सहाही लोकसभा मतदारसंघांमध्ये सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदानाची वेळ ही सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत आहे.मतदानासाठी मुंबई शहर जिल्हा प्रशासनाची सर्व तयारी पूर्ण झाली असून प्रशासन सज्ज आहे. लोकशाहीच्या या उत्सवात जिल्ह्यातील सर्व मतदारांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन, आपल्या मतदानाचा हक्क आवर्जून बजावावा, असे आवाहन मुंबई शहराचे जिल्हाधिकारी यांनी केले आहे. मंगळवार, ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे.

मतदान केंद्रांवर या' सुविधा उपलब्ध

मुंबई शहर जिल्ह्यात असलेल्या सर्व मतदान केंद्रांवर मतदारांसाठी प्रशासनातर्फे सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. किमान सुविधेची खात्री अंतर्गत मतदारसंघातील मतदान केंद्रांवर मतदारांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, मंडप, प्रसाधन गृह, दिव्यांग मतदारांसाठी मार्गिका (ठर्ाीि), स्वयंसेवक, व्हीलचेअर्स व विद्युत पुरवठा आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मतदार माहिती स्लिपचे वाटप सर्व नोंदणीकृत मतदारांना करण्यात आले आहे. त्यामुळे चला लोकशाहीच्या या उत्सवात आपण सहभागी होऊ या.

# केजरीवालांची स्टंटबाजी



दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची राजकीय सारीपाटावरील वाटचाल पाहता त्यांच्याबाबतीत कोण होतास तू, काय झालास तू' असे म्हणण्याची वेळ आता आली आहे. केजरीवाल म्हणजे एक उच्चशिक्षित, सुसंस्कृत चेहरा, आंदोलनातला सर्वसामान्य चेहरा, चळवळीतला चेहरा, समाजसेवक अण्णा हजारे यांचे सहकारी अशा विविध वलयांमुळे अल्पावधीतच अरविंद केजरीवाल यांची देशपातळीवर प्रतिमा निर्माण झाली आणि या प्रतिमेला एक वलय निर्माण झाले. राजधानी दिल्लीतील जनतेने अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत त्यांना दिल्ली विधानसभेची सत्ता सोपविली. सर्वच सुविधा मोफत देऊन त्यांनी जनसामान्यांची प्रशंसा मिळविली खरी, पण त्यातून त्यांनी प्रशासकीय अडचणी निर्माण केल्या. सर्व गोष्टी जनसामान्यांना मोफत दिल्या, पण त्या गोष्टी करण्यासाठी खर्च येतो. सर्व गोष्टींचे सोंग आणता येते, पण पैशाचे सोंग आणता येत नाही. या गोष्टी सरकारच्या तिजोरीतून कराव्या लागतात आणि हा निधी सरकार जनसामान्यांकडूनच कराच्या रूपाने उभारत असते. त्यामुळे जनसामान्यांची सहानुभूती मिळविण्यासाठी, त्या सहानुभूतीचे मत प्राप्तीकडे रूपांतर करण्यासाठी सत्ता मिळविण्याचा हा केजरीवालांचा खेळ होता. केजरीवालांना जमते, मग इतरांना का अशक्य आहे? असा सूर अन्य राज्यांतून आळविला जाऊ लागल्याने काहींनी त्याचे अनुकरणही करण्याचा प्रयत्न केला. पण हा मोफतचा प्रकार अंगलट येणार असून मोफत प्रकरणामुळे राज्याच्या तिजोरीवर भार पडून शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन करणे तसेच विकासाची कामे करणे अवघड जाणार असल्याचे निदर्शनास येताच अन्य राज्यकर्त्यांनी या मोफतच्या राजकीय खेळाला आवर घातला. स्वच्छ प्रतिमेचा नारा देत नव्हे, तर डांगोरा पिटत केजरीवाल सरकार दिल्लीच्या सत्तेवर आले. पाठोपाठ पंजाब राज्याची सत्ता मिळविली. आपचा झाडू भ्रष्टाचाराचा कचरा साफ करून राजकारणात स्वच्छता आणणार असे वाटत असतानाच स्वच्छतेचा आव आणणारे देखील काँग्रेससारखेच भ्रष्टाचाराच्या पालखीचे भोई निघाले. स्वच्छतेचा बुरखा पांघरणाऱ्या अरविंद केजरीवाला यांचा खरा चेहरा गेल्या काही दिवसांमध्ये देशातील जनतेसमोर आला आहे. केवळ आणि केवळ स्टंटबाजी करणारे केजरीवाल हे कलाकार असल्याचे आता देशातील जनतेकडूनच बोलले जात आहे. केजरीवाल हे सध्या जामिनावर आहेत. भ्रष्टाचारप्रकरणी त्यांची चौकशी सुरू असून त्यांना तुरुंगवारीही झालेली आहे. केवळ लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका असल्याने न्यायालयाने सशर्त जामीन दिला आहे. निवडणुकांचा प्रचार, मतदान संपताच त्यांना पुन्हा तुरुंगात जावे लागणार आहे. जामीन देताना अनेक अटीही केजरीवाल यांना घातल्या आहेत. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना नवीन अबकारी धोरणात (मद्यधोरण) भ्रष्टाचार आणि अनियमिततेच्या आरोपावरून ईडीने २१ मार्चला अटक केली होती. त्यानंतर त्यांची रवानगी ईडी कोठडीत करण्यात आली; परंतु तुरुंगात जावून प्रतिमा मलीन झाल्यानंतरही चोर कोतवाल को डाटे' अशा थाटात केजरीवाल यांची राजकारणात नौटंकी सुरू झालेली आहे. मद्यधोरण किंवा नवीन अबकारी धोरण प्रकरणात केजरीवाल यांच्यावर झालेले आरोप, ईडीने केलेली कारवाई या घडामोडी पाहता नैतिकदृष्ट्या केजरीवाल यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊन चौकशीला सामोरे जाणे आवश्यक होते. भ्रष्टाचार प्रकरणावरून दिल्लीत कधी काळी झालेल्या अण्णा हजारेंच्या आंदोलनातील एक चेहरा असणारे केजरीवाल भ्रष्टाचार प्रकरणी अडकल्याचा प्रशासकीय यंत्रणा टाहो फोडत असताना, चौकशीसाठी जेलवारी सुरू असताना आजही मुख्यमंत्रीपदाची खुर्ची सोडण्यास तयार नाहीत. दिल्लीकरांना आपल्या कामानिमित्त राज्याच्या मुख्यमंत्र्यांना भेटायचे असल्यास त्यांनी तुरुंगात भेटायला यायचे का, अशी समस्या आज निर्माण झालेली आहे. सध्या राज्यसभा खासदार स्वाती मालिवाल यांना केजरीवाल यांच्याच निवासस्थानी त्यांचे स्वीय साहाय्यक बिभवकुमार यांनी केलेल्या मारहाणीमुळे केजरीवाल पुन्हा एकवार चर्चेत आले आहेत. १३ मे रोजी मुख्यमंत्री केजरीवाल यांच्याच निवासस्थानी खासदार स्वाती मालिवाल यांना मारहाण झाल्याची घटना घडली आहे. जर मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी त्यांच्याच पक्षातील खासदार महिलेला मारहाण होत असेल, तर त्या राज्यात महिलांना कितपत सुरक्षा मिळत असेल, महिलांना कितपत सुरक्षित वाटत असेल, हाही प्रश्न यानिमित्ताने निर्माण झाला आहे. त्यातही संबंधित पीडित महिला कोणी सर्वसामान्य नसून या देशातील राज्यसभेच्या खासदार आहेत. त्यांना मासिक पाळी असतानाही व संबंधित महिला सांगत असतानाही मारहाण होते, या घटनेतून मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी अमानुषतेचा किती कळस गाठला गेला आहे, याची कल्पना येते.

आपल्याच निवासस्थानी महिलेला मारहाण झाल्यावर केजरीवाल यांच्या जाहीर भूमिकेची, प्रतिक्रियेची देशवासीयांना प्रतीक्षा होती. पण केजरीवालांनी या प्रकरणी मौनी भूमिका घेत बिभवकुमार यांची पाठराखणच केल्याचे पाहावयास मिळाले आहे. बिभवकुमार यांची कानउघाडणी करून त्यांना सेवेतून निलंबित करून या प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश केजरीवाल यांनी देणे अपेक्षित होते. पण केजरीवाल असे करतील तर ते केजरीवाल कसले? राजकीय नौटंकी नसानसात भिनलेल्या केजरीवाल यांनी या प्रकरणी भाजपावरच खापर फोडण्याचे धाडस केले. केजरीवाल यांचे खासदार, मंत्री भ्रष्टाचाराच्या आरोपावरून तुरुंगात आहेत, केजरीवाल स्वत: तुरुंगात जाऊन आले आहेत. काही दिवसांसाठी जामिनावर आले आहेत. निवडणुका व मतदान संपताच त्यांना पुन्हा तुरुंगवारी अटळ आहे. त्यांनी बिभवकुमार यांना काहीही न बोलता उलटपक्षी आम आदमी पक्षाच्या मागे का लागले आहेत हे लोक.

एकामागोमाग एकाला हे तुरुंगात टाकत आहेत. संजय सिंहांना तुरुंगात टाकले, माझ्या पीएला टाकले. आता हे म्हणतात की, राघव चड्ढा यांनाही जेलमध्ये टाकणार. सौरभ, अतिशी यांनाही तुरुंगात टाकणार. मी हा विचार करतोय की हे आम्हाला तुरुंगात का टाकत आहेत. आमचा गुन्हा काय? असा प्रश्न दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी उपस्थित केला. अर्थात केजरीवाल यांच्याकडून दुसरी कोणती अपेक्षा आपण करणार? मुंबईत महायुतीच्या बीकेसीतील सभेतही त्यांनी आपल्या व आपल्या मंत्र्यांवरील आरोपांचे व तुरुंगवारीचे राजकीय भांडवल करत भाजपावर टीका केली. केजरीवाल यांचा राजकीय थयथयाट आता भारतीयांच्याही एव्हाना लक्षात आला आहे.भ्रष्टाचाराचे भांडवल करत, विरोधकांवर तोफ डागत राजकीय सारीपाटावर आलेले, दिल्लीच्या सत्तेवर बसलेले केजरीवाल व त्यांचे सहकारी भ्रष्टाचाराच्या विळख्यात अडकले आहेत. महिला खासदारांना त्यांच्या निवासस्थानी मारहाण होत आहे. या घटना गंभीर असतानाही केजरीवालांची राजकीय सारीपाटावर नौटंकी सुरूच आहे. केजरीवाल यांचा हा खेळ फार दिवस चालणार नाही. भ्रष्टाचार प्रकरणाच्या चौकशीत सत्य लवकरच बाहेर येईल. जनताही आता केजरीवालांच्या नौटंकीला कंटाळली असून मतपेटीतून जनतेने उत्तर दिल्याचे ४ जूनला नक्कीच पाहावयास मिळेल.

**-अल्पेश म्हात्रे**

# दररोज आवळ्याचे सेवन करण्याचे हे आहेत चमत्कारी फायदे



मुंबई: आवळ्यामध्ये औषधीय गुण भरलेले असतात. आयुर्वेदात आवळ्यामध्ये अनेक पोषकतत्वे सांगितलेली आहे. आयुर्वेदाच्या दृष्टीने आवळा हे बहुगुणी फळ आहे. आवळ्यामध्ये आर्यन, पोटॅशियम, व्हिटामिन सी मोठ्या प्रमाणात असते.

आवळ्यामुळे ब्लड शुगर कंट्रोल करण्यास मदत होते.

आवळ्यामध्ये मोठ्या प्रमाणात अँटीऑक्सिडंट असतात.

केस आणि त्वचेच्या आरोग्यासाठी आवळा अतिशय फायदेशीर आहे.

याच्या सेवनाने पाचनतंत्रही सुधारते. आवळ्यामुळे रोगप्रतिकारक क्षमताही वाढते.

दररोज एक आवळा खाल्ल्याने डोळ्यांचे आरोग्यही सुधारण्यास मदत होते. आवळ्याच्या सेवनाने डोळे निरोगी आणि तंदुरुस्त राहतात. यातील व्हिटामिन सी आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे.

रिकाम्या पोटी आवळ्याचा रस प्यायला असता रोगप्रतिकारक क्षमता, पचनशक्ती तसेच केस निरोगी होतात. दररोज सेवन केल्यास कोलेस्टेरॉलची पातळी कमी होते.

# आता संघाची गरज नाही का?

मोदी आणि शहा सांगत असलेले संख्याबळ भाजपने गाठल्यास निर्णयां'च्या बाबतीत भाजप अधिक स्वतंत्र होणार, यात शंका नाही. ते न घडल्यास सैल पडलेली भाजपवरील पकड पुन्हा घट्ट करण्यासाठी संघ सक्रिय होऊ शकतो.

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघासंदर्भात केलेल्या विधानामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. भाजपला एकेकाळी संघाची गरज होती; पण आता भाजप मोठा आणि सक्षम झाला आहे, असे नड्डा एका मुलाखतीत म्हणाले. निवडणुकीचा पाचवा टप्पा काल पूर्ण झाला. आणखी दोन टप्पे बाकी आहेत. म्हणजेच, ऐन रणधुमाळीत नड्डा यांनी तर्क-वितर्कांना वाट करून दिली, असे म्हणावे लागेल. भाजपला आता संघाची गरज नाही, असे नड्डा स्पष्ट म्हणाले नसले तरी भाजप स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ शकतो, हे मात्र त्यांनी थेट सांगितले. संघ ही सांस्कृतिक आणि सामाजिक संघटना आहे, संघाचे काम वैचारिक तर भाजपचे राजकीय आहे, ही परिवारातून नेहमी केली जाणारी मखलाशी नड्डा यांनीही केली. अन्य पक्षांची यंत्रणा बूथ पातळीपर्यंत असतेच असे नाही, भाजपला ते शक्य होते याचे कारण त्या-त्या भागातील संघ स्वयंसेवकांचा पुढाकार. जवळपास प्रत्येक निवडणुकीतील हे चित्र. किमान या यंत्रणेसाठी संघ स्वयंसेवकांऐवजी पक्ष कार्यकर्त्यांचा पर्याय भाजपमध्ये रुजला किंवा कसे? हा प्रश्न पडू शकतो. आजचा भाजप मोठा आहे, असे नड्डा म्हणाले; पण हे मोठेपण संघाच्या मुशीत घडलेल्या स्वयंसेवकांमुळे पक्षाला मिळाले की बाहेरून आयात केलेल्या नेते- कार्यकर्त्यांमुळे?



याबद्दल नड्डा यांनी मौन पाळले आहे.


अस्वस्थता वाढली-

राजकीय विश्लेषकांच्या मतानुसार संघ, भाजप यांच्या विचारांशी देणेघेणे नसलेल्या नेते-कार्यकर्त्यांची भरती, हे संघातील अस्वस्थतेचे कारण आहे आणि मुळात आजच्या भाजपचा विचार' सत्तेशिवाय दुसरा कुठला असल्याचे दिसत नाही! १९२५ मध्ये संघाची स्थापना झाली. पुढील वर्षी संघाची शताब्दी आहे. केंद्रात सलग दोनदा भाजपचे सरकार बहुमताने आले. जम्मू-काश्मीरमधील ३७०वे कलम रद्द करणे, तिहेरी तलाक हद्दपार करणे हे निर्णय भाजप सरकारने घेतले. अयोध्येत राम मंदिर उभे राहिले. या पार्श्वभूमीवर संघ आणि परिवाराकडून संघ शताब्दी दणक्यात साजरी होणार, अशीच अटकळ सर्वांनी बांधली. मात्र, सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी, संघ शताब्दी साजरी करणार नाही, असे जाहीरपणे अलीकडेच सांगून चकित केले.

भाजपचे आजचे शीर्षस्थ नेते आणि संघाचे धुरिण यांच्यात अंतर निर्माण झाले आहे का? या मुद्द्यावरील चर्चेने भागवत यांच्या विधानामुळे जोर पकडला. त्यात आता नड्डा यांच्या विधानाची भर पडली आहे. नड्डा यांची अध्यक्षपदाची मुदत संपली होती, निवडणुका जवळ असल्याने या पदावर तूर्तास बदल नको, अशी भूमिका घेत त्यांना मुदतवाढ देण्यात आली. निवडणूक निकालानंतर भाजपची कामगिरी, सत्ता समीकरणे हे पाहून नवा अध्यक्ष ठरेल. नड्डा यांनी काहीही म्हटले तरी त्यावेळी संघाची भूमिका निश्चितच महत्त्वाची राहणार आहे. आज त्या अर्थाने भाजपमधील अंतर्गत संघर्ष उघडपणे दिसत नाही. याचे कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रतिमा. ती पक्षापेक्षा मोठी आहे, हे मान्यच करावे लागेल. पण, संघाच्या परिभाषेत व्यक्ती नव्हे, तर संघटना मोठी असते. भाजपच्या संघटनमंत्री पदावर कोण असावे, याचा निर्णय संघाकडूनच केला जाण्याची प्रथा आहे.

संघ आणि भाजपमधील ती प्रक्रिया पूर्वीसारखी सुरळीत राहिलेली नाही, असे सांगितले जाते. चेक अँड बॅलन्स'मध्ये आज संघापेक्षा भाजपचे पारडे जड दिसते. २०१४ आणि २०१९ मध्ये भाजपकरता देशात जे अनुकूल वातावरण होते तसे आज आहे, हे म्हणता येत नाही. आयात' नेत्यांसाठी आम्ही काम करावे का? असा प्रश्न संघाच्या जुन्या फळीतील कार्यकर्त्यांना पडल्यास नवल नाही. संघ स्वयंसेवक भाजपच्या मदतीला नाहीत, अथवा असल्यास मनापासून नाहीत, असे मानण्यासारखी स्थिती आहे. नागपूरच्या महाल भागात कमी मतदान झाले. त्यानंतर हाच मुद्दा चर्चेला आला. पक्ष सक्षम असेल तर अनेक नेते निवडणूक प्रचारात दिसायला हवे होते. मोदी यांचाच चेहरा घेऊन भाजपला पुढे जावे लागत आहे आणि प्रचाराची धुरा देखील मोदी एकहाती सांभाळत असल्याचे दिसते, हे सूचक म्हणावे लागेल.

# राशी भविष्य



२२ मे २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग:पिवळा: शुभ दिशा:पश्चिम
जीवनसाथीचे सहकार्य आपल्याला मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. प्रतिष्ठीत लोकांच्या भेटीमुळे आपल्या फायद्यात वाढ होईल. प्रवासात सावधानी बाळगा.

वृषभ : शुभ रंग:निळा, शुभ दिशा: पूर्व
जीवनसाथीच्या प्रकृतीची चिंता जाणवेल. खर्च वाढल्याने आर्थिक टंचाई भासणार आहे. व्यापारा व्यवसाय सामान्य राहील. वादविवादापासून दूर रहा.

मिथुन : शुभ रंग: काळा, शुभ दिशा: पश्चिम
प्रतिष्ठीत व्यक्तींच्या संपर्कामुळे फायदा होईल. आपल्या आर्थिक परिस्थिती सुधारेल. कामे टाळण्याचा प्रयत्न करू नका. व्यापारातील नवीन योजना फायदेशीर राहतील.

कर्क : शुभ रंग:गुलाबी,शुभ दिशा:पूर्व
जास्त धावपळ केल्याने थकवा जाणवेल. आपल्या अपक्षेप्रमाणे कामे होणार नाहीत. व्यवसायात फायदा मिळण्याची शक्यता कमी. आत्मविश्वास बाळगा.

सिंह : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:उत्तर
कौटुंबिक संबंध मधूर राहतील. मान सन्मान वाढेल. भागीदारीचे अनेक नवीन प्रस्ताव मिळतील. अनोळखी व्यक्तीपासून सावध रहा. अडकलेला पैसा मिळेल.

कन्या : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:उत्तर
व्यक्तिगत कामात प्रगती राहील. आर्थिक परिस्थिती सुधारणार आहे. समाजात आपले कौतुक होईल. व्यापार फायदेशीर राहील. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

तुळ: शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा: पूर्व
जोखमीचे व जबाबदारीचे कामे सावधतेने करा. निष्कारण धावपळ करू नका. प्रयत्न करून आज यश कमी मिळेल. कौटुंबिक समस्यांची चिंता राहील.

वृश्चिक: शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पूर्व
नम्रपणा सोडू नका. वयस्कर लोकांचा सन्मान व आदर ठेवा. व्यापारीक निर्णय वेळेत घेतल्याने फायदा होईल. कौटुंबिक समस्या दूर होतील.

धनु: शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
अति उत्साह आपल्याला नुकसान पोहचवेल. प्रवासाचा फायदा होणार नाही. अधिक खर्च करण्याची प्रवृत्ती सोडा. व्यापार मध्यम राहील.

मकर : शुभ रंग:भूरकट, शुभ दिशा:उत्तर
व्यापार चांगला चालेल. संपत्ती बाबत आकांक्षा पूर्ण होतील. कामामध्ये यश मिळविण्यासाठी प्रयत्नशील रहा. कौटुंबिक किंवा घराची समस्या भेडसावेल.

कुंभ: शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:उत्तर
वेळेत कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. मित्रांचे व सगे सोयऱ्यांचे सहकार्य मिळेल. निष्कारण वाद विवाद, तणाव टाळला पाहिजे. व्यापाराती योग्य निर्णय फायदेशीर राहील.

मीन : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व
आपली दयाळू प्रवृत्ती, उदारतेमुळे आपल्याला एक नवीन सुख देऊन जाईल. नवीन पद मिळण्याची शक्यता आहे. गुंतवणूकीच्या बाबतीत जागृत रहा. मुलांचे जीवन समाधानी राहील.

२२ मे ला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर चंद्राचा दुहेरी त्याचप्रमाणे हर्षल व बुधाचा प्रभाव आहे. इतरांपेक्षा तुमची भावनिक आंदोलने जास्त होतात. विचारही बदलते असतात. बुध्दीला पटल्याखेरीज तुम्ही कोणत्या गोष्टीचा स्वीकार करत नाही. लोकांबल तुम्हाला सहानुभूती असली तरी बऱ्याच वेळा त्यांना धक्कादायक वाटतील असे विचार तुम्ही मांडता. जुन्या रूढी, परंपरा तुम्हाला जाचक वाटतात. आपल्या व्यक्तीस्वातंत्र्याचा त्यात कोंडमारा होतो असे तुम्हाला वाटते. स्त्रीमुक्ती, दलितांचा स्वयंनिर्णयाचा हक्क यासाठी प्रयत्न करता. एकदा घेतलेले निर्णय सतत बदलू नका. नाहीतर लोकांना तुमच्याबल विश्वास वाटणार नाही. आपली विचारसरणी पटवून देण्यासाठी इतरांच्या भावनेलाही आवाहन करा. मानसिक धक्क्याने मनोविकार अपस्मार होऊ शकतील. चंचलपणा धरसोड वृत्ती टाळण्यासाठी ध्यानप्रक्रिया अभ्यासा.

कार्यक्षेत्र : संशोधन करीत राहणे ही तुमची मूलभूत प्रवृत्ती आहे. बऱ्याच लोकांशी संपर्क येईल अशी कामे करण्यापेक्षा प्रयोगशाळेत शांतपणे एकाग्रतेने काम करणे तुम्हाला आवडते. भौतिकी, रसायन, औषधीज्ञान वगैरे क्षेत्रात महत्वाचे संशोधन तुम्ही करू शकाल. संगणक प्रणालींचा विकास वा पुनर्रचना, अंतराळविज्ञान, उपग्रहातर्फे दळणवळण, दूरसंचार, इंटरनेट वगैरे क्षेत्रेही अनुकूल ठरतील.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com




# यामी गौतमच्या घरी चिमुकल्या पावलांनी आला छोटा पाहुणा!



मुंबई -बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री यामी गौतम आणि तिचा पती दिग्दर्शक आदित्य धर यांनी त्यांच्या चाहत्यांना एक खुशखबर दिली आहे. याम ीच्या घरी चिमुकल्या पावलांनी छोट्या पाहुण्याचे आगमन झाले आहे. यामीला अक्षय तृतीयेच्या दिवशी म्हणजेच १० मे ला पुत्ररत्नाची प्राप्ती झाली. याबाबत या जोडप्याने आज आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन एक पोस्ट शेअर करत ही बातमी सांगितली आहे. 'आर्टिकल ३७०' या चित्रपटाच्या शूटिंगवेळी यामी गरोदर होती. त्यामुळे चित्रपटाच्या प्रोमोशनमध्ये ती सहभाग घेऊ शकली नाही. आपण गरोदर असल्याने चित्रपटाच्या प्रोमोशनमध्ये सहभागी होणार नसल्याचे याम ीने जाहीर केले होते. यामीने गुड न्यूज दिल्यानंतर चाहत्यांनी तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला होता. आज यामीने सोशल मीडियावर आपल्याला बाळ झाल्याची बातमी चाहत्यांसोबत शेअर केली. यावेळेस उभयतांनी आपल्या इन्स्टाग्राम पोस्टमध्ये यामी ज्या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होती त्या हॉस्पिटलच्या स्टाफ आणि डॉक्टर्सचे आभार मानले आहेत. त्यांनी म्हटले आहे की, 'आम्ही सूर्या हॉस्पिटलम धील अपवादात्मकपणे सम र्पित आणि अद्भुत वैद्यकीय व्यावसायिकांचे, विशेषत: डॉ. भूपेंद्र अवस्थी आणि डॉ. रंजना धनू यांचे मन:पूर्वक आभार मानू इच्छितो, ज्यांच्या कौशल्याने आणि अथक प्रयत्नांमुळे हा आनंदाचा प्रसंग शक्य झाला. आम्ही पालकत्वाच्या या सुंदर प्रवासाला सुरुवात करत असताना, आमच्या मुलाच्या उज्ज्वल भविष्याची आम्ही आतुरतेने अपेक्षा करतो. त्याने गाठलेल्या प्रत्येक मैलाच्या दगडासह, तो आपल्या संपूर्ण कुटुंबासाठी तसेच आपल्या प्रिय राष्ट्रासाठी अभिमानाचा दीपस्तंभ बनेल अशी आम्हाला आशा आणि विश्वास आहे'. यामीने आपल्या बाळाचे नाव 'वेद्विद' ठेवले आहे. चाहते या पोस्टवर अभिनंदनाचा वर्षाव करत आहेत.

# सुशांत दिवगीकरच्या घरात लागली आग

मुंबई,-फबिग बॉसफ रिॲलिटी शोमधून प्रसिद्धी मिळवलेला मॉडेल आणि गायक सुशांत दिवगीकरच्या घरात शनिवारी रात्री आग लागली. सुशांतच्या मुंबईतील वांद्रे येथील राहत्या घरातील एसीचा स्फोट झाल्यामुळे ही आग लागली. शनिवारी रात्री ११च्या सुमारास ही घटना घडली. काही क्षणांत आग पसरल्याने घरातील मालमत्तेचे प्रचंड नुकसान झाले. सुदैवाने सुशांत व त्याचे कुटुंबिय सुखरुप आ-हेत. आगीच्या घटनेने त्याच्या कुटुंबियांना धक्का बसला आहे.
सुशांत दिवगीकरच्या घरातील या स्फोटाबाबत त्याच्या मॅनेजरने माहिती दिली. त्याने सांगितले की, मफघरातील हॉलमध्ये सगळे जण शनिवारी रात्री जेवण करत असताना एसीमध्ये स्फोट होऊन आग लागली. मग लगेचच ही आग स्वयंपाकघरात आणि ऑफिसमध्ये पसरली. या घटनेत अवॉर्ड्स, घरातील काही उपकरणं, फर्निचर आणि काही महत्त्वाची कागदपत्रे जळाली आहेत. सुशांतचा मेकअप व त्याचे कपडेही या घटनेत जळाले आहेत.

# पाकव्याप्त काश्मीरमध्ये असंतोषाचा उद्रेक



दोनशे रुपये लिटर दूध, पैसे मोजूनही न मिळणारे पीठ, जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा, वाढलेले वीजदर यामुळे पाकव्याप्त काश्मीरमधील सामान्यांपुढे जगण्या-मरण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच दहशतवादीही सरकार विरोधात लढा देऊ लागले आहेत. पाकव्याप्त काश्मीर आणि बलुचिस्तान प्रांतात पाकिस्तानविरोधात सूर उमटत असून उघडपणे भारतात सामील होण्याची भाषा बोलली जात आहे. नेमके काय घडतेय पाकव्याप्त काश्मीरमध्ये?
भारतात लोकशाहीच्या मतोत्सवात पाकिस्तानचा मुद्दा वारंवार चर्चिला जात आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये पाकिस्तानची वा-ताहत झाली आहे. तिथल्या महागाईने जनतेचे जीणे हराम करून टाकले आहे. भारताविरोधात भावना भडकावून पोट भरत नाही, हे तिथल्या शासनकर्त्यांनाही आता कळून चुकले आहे. दोनशे रुपयांहून अधिक दराने घ्यावे लागत असलेले दूध, पैसे मोजूनही न मिळणारे पीठ आणि जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा, त्यात कर्जासाठीच्या अटीमुळे देशात वाढवावे लागलेले वीजदर यामुळे सामान्यांपुढे जगण्या-मरण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच दहशतवाद पोसण्यासाठी पूर्वी करत असलेल्या खर्चावर निर्बंध आल्याने दहशतवादीही तिथल्या सरकारविरोधात लढा द्यायला लागले आहेत.
तालिबानी दहशतवाद्यांचा नंगानाच सुरू आहे. बॉम्बस्फोट आणि आत्मघाती हल्ल्यांना सामोरे जात पाकिस्तानला आता दहशतवाद्यांना आश्रय दिल्याची किंमत मोजावी लागते आहे. त्यातच पुलवामा हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानशी व्यापारी संबंध तोडल्यामुळे पाकमधील नागरिकांना आता स्वस्तात मिळणाऱ्या जीवनावश्यक वस्तू मिळत नाहीत. हलाखीच्या आर्थिक स्थितीमुळे पाकिस्तानच्या चलनाला काडीचीही किंमत राहिलेली नाही. परदेशातील गुंतवणूक थांबली आहे. सरकारच्या धोरणामुळे उद्योजक नव्याने जोखीम पत्कारायला तयार नाहीत. संपूर्ण पाकमधील जनता महागाई आणि जीवनावश्यक वस्तूंच्या टंचाईने तसेच वीजबिलातील वाढीमुळे त्रस्त आहे. एकीकडे गेल्या पाच वर्षांमध्ये भारतातील नेते वारंवार पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घेण्याची भाषा करत असताना पाकव्याप्त काश्मीर आणि बलुचिस्तान प्रांतात पाकिस्तानविरोधात सूर उमटू लागले आहेत. बंडखोरीची भाषा बोलली जात आहे. काहींनी तर उघडपणे भार-तात सामील होण्याची तयारी दाखवली आहे.
पाकव्याप्त काश्मीरमध्ये (पीओके) सध्या युद्धसदृश स्थिती आहे. पाकिस्तानच्या अत्याचाराविरुद्ध काश्मिरी जनतेने बंड पुकारले




आहे. लोक रस्त्यावर उतरून पाकिस्तानचा निषेध करत आहेत. संतप्त जनता पाकिस्तानी सैन्याच्या गोळ्यांनाही घाबरत नाही. आंदोलक आणि पाकिस्तानी सुरक्षा दलांमध्ये अनेक ठिकाणी चकमक झाली आहे. त्यात एक उपनिरीक्षक ठार झाला, तर अनेक आंदोलक ठार आणि जखमी झाले. या आंदोलनामुळे पाकिस्तान सरकार हतबल झाले आहे. पाकिस्तानचे अध्यक्ष आसिफ अली झरदारी यांनी तिथल्या परिस्थितीवर विचारविनिमय करण्यासाठी राष्ट्रपती भवनात तातडीची बैठक बोलावली आहे. पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधील तणाव कमी करण्यासाठी उपाय शोधण्यासाठी सर्व संबंधितांना सहकार्य करण्याचे आव-ाहन केले आहे. अलीकडेच जम्मू-काश्मीर संयुक्त अवामी कृती समितीच्या आवाहनावर हजारो आंदोलक रस्त्यावर उतरले. या दरम्यान पाकिस्तानी सैन्याने आंदोलकांना रोखण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर अनेक ठिकाणी हिंसक चकमक झाली. अनेक भागांमधून हिंसाचाराची विदारक चित्रे समोर आली.
तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान' या अतिरेकी संघटनेने पाकिस्तानविरोधात मोर्चा काढणाऱ्या लोकांना पाठिंबा दिला आहे. पाकिस्तानी लष्कराविरुद्ध युद्ध पुकारणाऱ्या टीटीपी'ने एक निवेदन जारी करून म्हटले आहे की, पाकिस्तान प्रशासित काश्मीरमध्ये करमुक्त वीज आणि गहू अनुदानाची मागणी करणाऱ्या आंदोलकांना तेहरिक-ए-तालिबान' पूर्ण पाठिंबा देत आहे. काश्मिरींना पाकिस्तानी लष्कराविरुद्ध सशस्त्र लढा सुरू करण्याचे आवाहन करताना पाकिस्तानी लष्कराला केवळ ताकदीची भाषा कळते' असे या दहशतवादी संघटनेने म्हटले आहे. पाकिस्तानचे माजी पंतप्रधान आणि भारताविरुद्ध विष ओकणाऱ्या इम्रान खान यांच्या पक्षानेही पाकव्याप्त काश्मीरमधील आंदोलकांची छळवणूक आणि हिंसाचाराचा निषेध केला आहे आणि ते अस्वीकार्य असल्याचे म्हटले आहे. काश्मीरमधून कलम ३७० हटवल्यापासून पाकव्याप्त काश्मीर चर्चेत आहे.
नुकतेच सुब्रमण्यम स्वामी यांनीही ट्वीट केले होते की, पंडित जवाहरलाल नेहरू यांनी संयुक्त राष्ट्रात दाखल केलेला प्रस्ताव मागे घेऊन लष्कर पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घेऊ शकते.
राजकीय नेते काहीही म्हणत असले, तरी पाकव्याप्त काश्मीर खरेच पाकिस्तानच्या तावडीतून इतक्या सहजासहजी मुक्त होऊ शकते का? प्रस्ताव मागे घेऊन पाकव्याप्त काश्मीर मिळवता आला असता, तर यापूर्वी पाकिस्तानशी झालेल्या युद्धानंतर ते मिळवता आले असते, असे माजी लष्करप्रमुख जनरल दीपक कपूर सांगतात. याचा अर्थ त्यातील गुंतागुंत लक्षात घ्यावी. हा मुद्दा भारत आणि पाकिस्तानमधील आहे. संयुक्त राष्ट्राचा याच्याशी काहीही संबंध नाही. सीमला करारानुसार दोन्ही देशांना हा प्रश्न सोडवावा लागेल. पाकव्याप्त काश्मीर मिळवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे युद्ध आणि तेही भयंकर युद्ध. त्यासाठी आपली क्षमता वाढवावी लागेल. सध्याच्या ताकदीपेक्षा आपल्याला अधिक मजबूत व्हावे लागेल. सध्या भारत सर्वात बलवान आहे. सरकार सक्षम असून कठोर निर्णय घेऊ शकते. भारताचा काही भाग पाकिस्तान आणि चीनने लष्करी बळावर बळकावला होता. लष्करी बळावरच आपण ते परत मिळवू शकतो. यामध्ये कोणत्याही प्रकारचे कायदेशीर बंधन नाही; परंतु जागतिक बहिष्काराची किंमत मोजण्याची तयारी ठेवावी लागेल.
पाकव्याप्त काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, हे खरे आहे. पाकिस्तानने भारताचा काही भाग बळकावला आहे हेही खरे; पण तो परत आणण्याचा मार्ग संयुक्त राष्ट्रसंघाला सापडणार नाही. संयुक्त राष्ट्रात गेले तरी १९४७ मध्ये दाखल केलेल्या ठरावात पाकव्याप्त काश्मीर परत मिळवण्यासाठी सार्वमत घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ते आपल्यासाठी योग्य नाही. बालाकोट एअर स्ट्राईकच्या निमित्ताने आपल्यावर हल्ला झाला, तर



चोख प्रत्युत्तर तर देऊच; पण कुरापत काढणाऱ्याला मुळापासून नष्ट करू, असा संकेत आपण दिला आहे. आता आपल्याला दहशतवाद्यांना नियंत्रण रेषा ओलांडण्यापासून रोखायचे आहे. जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० हटवण्यात आल्याने तेथील परिस्थिती सामान्य होण्यास वेळ लागेल. पहिले लक्ष तिथल्या लोकांवर, विशेषतः खोऱ्यातील लोकांवर द्यायला हवे. कलम ३७० हटवणे फायदेशीर आहे, हे तिथल्या लोकांना समजेल आणि भारत सरकार आणि लष्कर त्यांच्या सुरक्षेसाठी आणि चांगल्या भविष्यासाठी काम करत आहे, हे लक्षात येईल तेव्हा पुढचा मार्ग आपोआप सुकर होईल.
पाकिस्तानमधील अलीकडील निदर्शने आणि त्या निदर्शनांमधील हिंसक दडपशाही दर्शवते की, पाकिस्तानची या प्रदेशावरील पकड कमी होत आहे. मुझफ्फराबाद आणि रावळकोटमधील स्थानिक लोक आणि अधिकारी यांच्यातील संघर्ष याची साक्ष देतात. रावळकोटमध्ये भारतात विलीनीकरणाची मागणी करणारी पोस्टर्स लागली. आंदोलकांवर अश्रुधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्यानंतर पाकव्याप्त जम्मू-काश्मीरमधील संतप्त रहिवाशांनी पोलीस अधिकाऱ्यांचा निषेध केला. एका अधिकाऱ्याने सांगितले की, पाकिस्तान पाकव्याप्त काश्मीरवरील पकड गमावत आहे आणि हा मुलुख भारताचा एक भाग बनण्याच्या जवळ जात आहे. दोन अल्पवयीन मुलींच्या मृत्यूमुळे येथे निदर्शने झाली. दहा जिल्ह्यांमध्ये आंदोलने झाली. त्यामुळे काश्मिरींशी पाकिस्तानची पोकळ एकता उघड झाली आहे. पाकव्याप्त काश्मीर हे सध्या पाकिस्तानसाठी एक दुखणे बनले आहे. परिस्थिती इतकी वाईट आहे की लोक पाकिस्तानी निमलष्करी दल आणि पोलिसांचा पाठलाग करून मारत आहेत. दरम्यान, बलुचिस्तानमध्येही तणाव वाढला आहे. बलुच नेता आणि सामाजिक कार्यकर्ता, आंदोलक मेहरंग बलोच यांनी ग्वादर बंदर शहराच्या कुंपणाला विरोध करण्याची शपथ घेतली आहे. कोणत्याही परिस्थितीत आमची जमीन आणि समुद्र परकीयांच्या स्वाधीन करणार नाही आणि असा कोणताही प्रकल्प यशस्वी होऊ देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. विकास आणि सुरक्षेच्या नावाखाली ग्वादरला कुंपण घालण्याच्या आणि चीनच्या ताब्यात देण्याच्या योजनेच्या विरोधात आपण रान उठवू, असा इशारा त्यांनी दिला आहे. अशा या अशांत परिस्थितीत पाकिस्तानी सरकार आणि लष्कराचीही कोंडी झाली आहे.**-प्रा. डॉ. विजयकुमार पोटे**

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ेळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर
आडवे उत्तर
१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.साम ना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा
उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ
४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५९.वर ६१.सर ६२.नवागत ७०.रमणी ७३.दार ७४.खापर
५३.माजघर ५५.कलम ६४.साम्य ६५.नापास ६७.म ७५.सोय ७७.गर ७८.धन
५६.पळपुटा ५७.रमताराम सलत ६८.सागवान ६९.गवा ७९.कंस

# शेणखतालाही मिळतोय सोन्याचा भाव

## एक ब्रासची किंमत आता तीन हजारावर



### असा होतो शेणखताचा फायदा

गुरांचे शेण, मूत्र, शेतातील पालापाचोळा, पिकांचे अवशेष, शहरातील कुजण्यायोग्य तत्सम सेंद्रिय पदार्थ जैविकरीत्या कुजवून सेंद्रिय खते तयार होतात. वापराने जमिनीची सुपिकता टिकून राहते आणि विषमुक्त धान्य मिळाल्यामुळे मानवाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत नाहीत. शेणखतामुळे वनस्पतींना उपयुक्त नत्र, स्फुरद, पालाश, कॅल्शियम, मॅग्नेशियम, गंधक व जस्त, लोह, बोरॉन ही सूक्ष्म अन्नद्रव्ये असतात. ही अन्नद्रव्ये वनस्पतींच्या मुळाद्वारे पिकांना हळूहळू उपलब्ध होत असल्यामुळे पीक वाढीच्या काळात सतत अन्नपुरवठा कायम राहतो.

प्रशांत तांबोळकर

शिरूरआनंतपाळ : रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीची सुपिकता घसरत चालली आहे. त्यामुळे अनेक शेतकरी सेंद्रिय शेती, जैविक शेती करण्यावर भर देत आहेत. त्यासाठी शेतकरी मुख्यतः शेणखताचा वापर करत आहेत. मात्र, यांत्रिकीकरणामुळे गाय, म्हैस, बैल, शेळ्या, मेंढ्यांची पशुधनात होणारी घट यामुळे शेणखताला सध्या सोन्याचा भाव आला आहे. येरोळ सह परिसरातील गावामध्ये एक ब्रास शेणखताला आता तीन हजार रुपये मोजावे लागत आहेत.

दहावर्षापुवी गाव शिवारात सहज मिळणारे शेणखत आता अधिक दरात मिळत आहे. येरोळ येथील शेतकरी गुंडेराव चौसष्टे या शेतकऱ्याने आपल्या शेतात सेंद्रिय पिकांची लागवड केली असून, त्यांच्या शेतात सहा पाळीव म्हशी व चार गावरान गाई व दोन बैल जोडी आहेत. त्यांच्यापासून मिळणाऱ्या शेणाचा वापर ते शेणखत म्हणून करीत आहेत.

मजुराची टंचाई व यांत्रिकीकरणामुळे, गाय, म्हैस, बैल, शेळ्या अशा पशुधनाच्या किमती वाढल्याचा फटकाही पशुपालनास बसला आहे. चाऱ्याचे वाढलेले भाव व चारा टंचाई यामुळे शेतकरी जनावरे पाळण्यास नकार देत आहेत, तर अनेक शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीची कास धरल्यामुळेही शेणखताची मागणी वाढली आहे. पूर्वी एक हजार ते दीड हजार रुपये ट्रॅक्टर-ट्रॉली या दराने शेणखत मिळत होते, ते सध्या चार हजार ते पाच हजार ट्रॉलीप्रमाणे मिळत आहे.

शेण, मूत्र, शेतातील पालापाचोळा यापासून जे खत तयार होते, ते आम्ही शेतात वापरतो, शेतात टाकुण शिल्लक राहिलेले शेणखताची विक्री करतो, रासायणीक खताचे दर वाढल्यामुळे व अनेक नोकरदार, मोठमोठे व्यापारी शेती खरेदी करुन सेंद्रीय शेती करण्याकडे त्यांचा कल वाढला आहे. त्यामुळे शेणखताचा दरही वाढला असल्याचे येरोळ यथील शेतकरी गुंडेराव चौसष्टे यांनी सांगितले.

# सार्वजनिक वाचनालयाचे प्रश्नासाठी

## शासन दरबारी पाठपुरावा करु :आ.भालेराव




उदगीर (प्रतिनिधी) सार्वजनिक ग्रंथालयाचे प्रश्न सोडवण्यासाठी शासनदरबारी पाठपुरावा करु असे आश्वासन माजी आ.सुधाकर भालेराव यांनी दिले.

ते उदगीर तालुक्यातील चांदेगाव येथे ज्ञानसागर सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय मेळाव्यामध्ये मार्गदर्शन करताना बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे हे होते. तर मार्गदर्शक म्हणून माजी आमदार सुधाकर भालेराव, जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्रीमती वंदना काटकर, मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राम मेकले, डॉ. अमित म्हेत्रे,जिल्हा ग्रंथालय संघाचे संचालक संतोष करमले, अनिल पाटिल,सरपंच पंकज मुसने इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना भालेराव म्हणाले की, महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते आणि कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न गेल्या कित्येक वर्षापासून प्रलंबित आहेत. सामाजिक जाणीव जपत वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजाला दिशा देणाऱ्या प्रामाणिक कार्यकर्त्याला तुटपुंजा मानधनावर काम करावे लागत आहे. ही या समाज व्यवस्थेची शोकांतिका आहे. कधीकाळी समाजसेवा म्हणून केले जाणारे काम, आता शासनाच्या नियम आणि अटीच्या अधीन राहून करावे लागत असल्यामुळे मिळणाऱ्या मोबदल्यापेक्षा दगदग जास्त, अशी अवस्था निर्माण झाली आहे. ग्रामीण भागातील ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवणे गरजेचे आहे. कारण ते त्यांच्या जिव्हाळ्याचे आहेत. असे विचार माजी आमदार सुधाकरराव भालेराव यांनी व्यक्त केले.

सद्यस्थितीत ग्रंथालयीन कर्मचारी, संस्था अंतर्गत व्यवस्थापन आणि शासन दरबारी बसलेल्या अधिकारी वर्ग आणि त्यांच्या नियम आणि अटी यांच्या चक्रव्यूहात अडकला आहे. कित्येक वेळा तांत्रिक अडचणी पुढे करून ग्रंथालयाची व कर्मचाऱ्यांची कुचंबना केली जात आहे हे थांबले पाहिजे. ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांना ऑनलाइन पद्धतीने कामे करणे थोडेसे त्रासदायक आहे. त्यामुळे त्यांच्या अडचणींचा विचार करून अधिकारी वर्गाने सहकार्य करणे गरजेचे आहे. वाचनालयाच्या प्रश्र्नासाठी आपण सदैव चळवळी सोबत आहोत. काही वेळा राजकीय पक्षाची विचारधारा आणि आंदोलकांची विचारधारा यामध्ये ताळमेळ बसत नसला तरी एक सामाजिक प्रश्र्न म्हणून जनाधार मोर्चाचा विचार करून हे प्रश्र्न सोडवण्यासाठी महाराष्ट्रातील ग्रंथालयीन कर्मचारी, चळवळीतील कार्यकर्ते यांच्या खांद्याला खांदा लावून आपण राज्यभर काम करायला मागेपुढे पाहणार नाही. कर्मचाऱ्यांचे प्रश्र्न सोडवण्यासाठी आपण सदैव प्रयत्न करू. असे आश्र्वासनही याप्रसंगी त्यांनी दिले.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्रीमती वंदना काटकर यांनी मार्गदर्शनात ग्रामीण भागातील वाचनालयाच्या वार्षिक अहवाल, अंकेक्षण अहवाल, तपासणी अहवाल या अनुषंगाने येणाऱ्या तांत्रिक अडचणी आणि त्यावर मात कशी करावी या संदर्भात आवश्यक ते मार्गदर्शन केले. कर्मचाऱ्यांनी घाबरून न जाता जे जे नवीन नियम आणि अटी येत आहेत, त्याप्रमाणे आपले काम अद्यावत ठेवावे, असेही आवाहन त्यांनी केले. यावेळी जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे, मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राम मेकले यांनी वाचार मांडले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानसागर वाचनालयाचे संस्थापक ग्रंथ मित्र सूर्यकांत शिरसे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोरखनाथ नागठाणे यांनी तर आभार प्रदर्शन ज्ञानेश्र्वर पारसेवार यांनी केले. ज्ञानसागर सार्वजनिक वाचनालयाचे सचिव चंद्रकांत शिरसे, ग्रंथपाल कालिदास शिरसे, चंद्रशेखर ढगे, लक्ष्मण फुलारी, गोविंद पाटील, योगेश्र्वर पाटील, माधव भोसले, विमल देशपांडे, यशवंत कुलकर्णी, राजपाल देवशेट्टे, अनिल पाटील, सुनील पाटील, रामेश्र्वर बिरादार नागराळकर, उद्धव तवडे, प्रसाद शिरसे यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाचनालयाचे सचिव चंद्रकांत सिरसे व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# मलेरियाविरुद्ध लढण्यासाठी जेएनयू मध्ये लस विकसीत

नवी दिल्ली : - जगभरात मलेरियामुळे दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो. हा एक गंभीर आजार आहे. डासांमार्फत होणा-या या आजारावर वेळीच उपचार नाही केले तर रूग्णाला मृत्यू येऊ शकतो. परंतु, या मलेरियावर नुकतीच एक लस शोधण्यात आली आहे.

दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या पथकाने ही मलेरियावरील लस विकसित केली आहे. ही लस मलेरियाविरूद्ध अधिक प्रभावी आणि आजाराला प्रतिबंध घालण्यासाठी उपयुक्त ठरू शकते.

सेल प्रेसच्या आयसायन्स या नियतकालिकामध्ये या विषयीचे संशोधन प्रकाशित करण्यात आले आहे. त्यांचे हे संशोधन लस विकसित करण्यासाठी परजीवी प्रोहायबिटिन प्रोटिनचे एक नवीन लक्ष्य म्हणून समोर आले आहे. मलेरिया हा आजार मादी ॲनोफिलीस डासाद्वारे पसरणारा एक वेक्टर-जनित रोग आहे.

या आजाराने आतापर्यंत लाखो लोकांचा बळी घेतला आहे. या आजारावर आतापर्यंत सतत संशोधन आणि प्रयत्न करण्यात आले आहे, तरी देखील जागतिक आरोग्य संघटनेच्या २०२२ च्या अहवालात जगभरात २४९ दशलक्ष प्रकरणे आणि ६० हजार ८०० मृत्यूंसह एक भीषण चित्र समोर आले आहे.



जेएनयू पथकाने नेमके काय केले?

स्पेशल सेंटर फॉर मॉलिक्यूलर मेडिसिनच्या जेएनयूमधील प्राध्यापिका शैलजा सिंह आणि प्राध्यापक आनंद रंगनाथन यांच्या नेतृत्वाखालील झालेल्या या संशोधनात एक नवीन होस्ट-परजीवी इंटरॅक्टिंग कॉम्प्लेक्स ओळखले आहे. जे एक यशस्वी लस धोरण अनलॉक करण्याची एक महत्वाची गुरूकिल्ली ठरू शकते.

दरम्यान, या संदर्भात बोलताना प्राध्यापिका शैलजा सिंह म्हणाल्या की, आमच्या संशोधनात आम्ही एक नवीन PHB2-Hsp70A1A रिसेप्टर लिगँड जोडी ओळखली आहे. ही जोडी परजीवीला मानवी शरीराच्या आत संसर्ग होण्यास मदत करते. यावर आता परजीवी प्रोटिन PHB2 एक ताकदवान लस म्हणून काम करू शकते.

दरम्यान संशोधकांनी हे शोधून काढले आहे की, मेरोजोइटच्या पृष्ठभागावर आढळून येणारे PfPHB2 प्रोटिन लाल रक्तपेशींच्या पृष्ठभागावरील हीट-शॉक प्रोटिन Hsp701 सोबत क्रिया करते. विशेष म्हणजे या अँटीबॉडी उपचारांमुळे यामध्ये व्यत्यय निर्माण झाला, ज्यामुळे परजीवीची वाढ पूर्णपणे थांबली.

## पान १ वरून

### मुख्यमंत्री दुष्काळसदृश....

त्यामुळे तात्काळ मदत आणि उपायोजनांची गरज आहे. मात्र निवडणुकीमुळे राज्यात सध्या आचारसंहिता लागू आहे.त्यामुळे अशा स्थितीत मराठवाड्यासह इतर दुष्काळसदृश भागांना मदत करताना अडचणी येत आहेत. राज्यातील काही भागातील दुष्काळसदृश स्थिती लक्षात घेता त्यांना मदत करण्यासाठी, उपायोजना आखण्यासाठी आचारसंहिता शिथिल करावी, अशी राज्य सरकारने निवडणूक आयोगाकडे विनंती केली आहे.

दरम्यान राज्य सरकारच्या या विनंतीवर निवडणूक आयोग विचार करत आहे. आज याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे. आचारसंहिता शिथील झाल्यास राज्य सरकारच्या दुष्काळी उपाययोजनांना गती मिळणार आहे.

### बारामतीत...

पवारही आता बारामतीत सक्रिय झाले असल्याने आता बारामतीचं शीतयुद्ध कोण जिंकणार? यावर सध्या जोरदार चर्चा होताना दिसते.

### अल्पवयीन मुलाला...

विशाल अग्रवालच्या चालकाने कल्याणीनगर अपघात प्रकरणामध्ये आपला जबाब नोंदवला आहे. याच जबाबाचा दाखल पोलिसांनी कोर्टात दिला. विशाल अग्रवालने त्याच्या चालकाला, मुलाने गाडी चालवायला मागितली तर त्याला चालवू दे! तू बाजूला बस, अशी सूचना केल्याची माहिती पोलिसांनी कोर्टाला दिली.

गाडीत होता टेक्निकल फॉल्ट

अपघातग्रस्त गाडीला नंबर प्लेटही नव्हती, असे कोर्टाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर विशाल अगरवालच्या वकिलांनी, या गाडीत बिघाड असल्याने बंगळूरमधील डीलरकडे त्यासंदर्भात पाठपुरावा सुरू होता. कोर्टासमोर आरोपीच्या वकिलांनीच ही माहिती दिल्यानंतर, गाडीत बिघाड असताना ती रस्त्यावर आणलीच काही असा प्रश्र्न न्यायाधिशांनी उपस्थित केला.

### ग्रामीण टी-१०...

उतरलेल्या चाकूर संघाने १० षटकात ९ गडी गमावत ११२ धावा केल्या. सचिन पाटील ५०(२१), तिरुपती राठोड २७(१२) यांनी चाकूरचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. नवनाथ वाकडे यांनी २ षटकात ६ धावा देत २ बळी घेऊन चाकूर संघावर दबाव निर्माण करण्यात यश मिळवले. त्यानंतर फलंदाजीला उतरलेल्या रेणापूरने आकाश आडे ५१(१८) आणि सचिन पवार ५०(२१) यांच्या अर्धशतकीय खेळीच्या बळावर उपांत्य फेरीत दिमाखदार प्रवेश केला. आकाश आडे सामनावीर ठरला. दुस-या उपांत्य फेरीसाठी सुरु असलेल्या सामन्यात लातूर शहर संघाने लोहा-कंधार संघाविरुद्ध शानदार खेळ करीत उपांत्य गाठली आहे.

लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिप ग्रामीण टी१० स्पर्धेत पहिल्यांदाच सहभागी झालेल्या लोहा-कंधार संघाने पहिल्यांदा फलंदाजी करीत ८.४ षटकात सर्वबाद ६४ धावांचे माफक आव्हान लातूर शहर संघाला दिले. लातूर शहर संघाकडून सलीम शेख यांनी हॅटट्रीक केली. त्यांनी १.४ षटके निर्धाव टाकत ४ बळी घेतले. मुहम्मद यांनी २ षटकात ३ बळी घेत सलीम शेख याला चांगली साथ दिली. सलीम शेख सामनावीर ठरला. लातूर शहर संघाने ५ गडी गमावत विजय साकार केला. लोहा-कंधार संघाने सामना गमावला असला तरी गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात चांगली कामगिरी करीत क्रिकेटरसिकांचे मने जिंकली.

उपांत्य फेरीतील सामने आज (दि.२४) शुक्रवारी लातूर क्रीडा संकुल येथे पहिल्या उपांत्य सामन्यात रेणापूर संघाची गाठ उदगीर विरुद्ध निलंगा सामन्यातील विजयी संघाशी तर लातूर शहर संघाची गाठ अहमदपूर विरुद्ध शिरुर अनंतपाळ यांच्यातील विजयी संघाशी होणार आहे. शिरुर अनंतपाळ संघाने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला असून दोन्ही संघाच अटीतटीचा सामना सुरु आहे.

### चार हजार...

यासोबतच काळी गुंजा, लाल गुंजा, पांढऱ्या गुंजा, पांगारा, पळस पापडी, आपटा, सब्जा, लाजवंती, काटे सराटा, बहावा, कडुलिंब अशा दुर्मिळ आयुर्वेदिक उपयोगाच्या वनस्पतींच्या बिया बीज गोळे बनवण्यासाठी वापरण्यात आल्या. हे बीज गोळे बनवण्यासाठी लाल माती, काळी माती, शेणखत, मुंगी पावडर यांचे योग्य मिश्रण करून बीज गोळे तयार करण्यात आले.

जिल्हाधिकारी सौ. वर्षा ठाकूर घुगे मॅडम यांनी स्वतः बीज गोळे बनवून सदस्यांना व आयटीआयच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत केले. लातूर जिल्ह्याचे हरित आच्छादन वाढवण्याकरिता ग्रीन लातूर वृक्ष टीमने मागील १८१९ दिवसांपासून अखंड अविरतपणे श्रमदान केले, प्रयत्न केले ते अत्यंत मोलाचे असून यामुळे लातूर जिल्ह्यामध्ये सर्वत्र हिरवळ दिसून येत आहे याबद्दल जिल्हाधिकारी मॅडम यांनी ग्रीन लातूर वृक्ष टीम सदस्यांचे कौतुक केलं.

तयार झालेली बीजगोळे ही आयुर्वेदिक औषधांच्या उपयोगाची असल्याने आयुर्वेदिक दृष्ट्या उपयोगाची असल्याने आणि याच्यामध्ये छोट्या छोट्या बिया असल्यामुळे त्यांची उगवण क्षमता ही जास्त आहे विशेष:ताने तुळशीच्या बियांची उगवण क्षमता ही खूप जास्त असते, कमी पावसात या बिया लवकर रुजतात, रोप उगवतात आणि परत याच्या मंजुळा आल्यानंतर एका झाडापासून शे-दोनशे बिया होऊन त्यांचा प्रसार होतो. वडवळ नागनाथ बेट, हत्ती बेटचं जंगल, येडशीच जंगल या ठिकाणी श्रावण महिन्यात ह्या बीजगोळ्यांचं रोपण करण्यात येणार आहे. आणि हे रोपण झाल्यानंतर त्यापासून निश्चितच काही प्रमाणात झाडं उगवतील असा विश्वास जिल्हाधिकारी यांनी व्यक्त केला.

आजचा हा उपक्रम यशस्वी होण्याकरिता ग्रीन लातूर वृक्ष टीम सदस्यांनी बियांचे संकलन करण्यापासून, मातीचे मिश्रण करण्यापासून, बीज गोळे बनवण्यासाठी परिश्रम घेतले.

### पाणी टंचाई...

२०२४ या कालावधीकरिता २ हजार ४२० उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या होत्या, यासाठी ४३ कोटी ७६ लाख ४९ हजार रुपयांच्या कृती आराखड्याला मंजुरी देण्यात आली आहे. सद्यस्थिती जिल्ह्यात औसा, अहमदपूर, जळकोट, लातूर, रेणापूर आणि उदगीर तालुक्यातील एकूण २६ गावे आणि १२ वाड्यावर टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. यासाठी ५ शासकीय आणि ३० खासगी टँकर अधिग्रहित करण्यात आले आहेत. तसेच जिल्ह्यात ३३५ गावांमधील ३९५ विहिरी, विंधन विहिरी पाणी पुरवठ्यासाठी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत.

नळ योजना विशेष दुरुस्ती प्रस्तावांना मान्यता

पाणी टंचाई निवारणार्थ सन २०२३-२४ मध्ये नळ योजना विशेष दुरुस्ती उपाययोजनांच्या ५ कोटी ४२ लाख ४१ हजार रुपयांच्या ५७ प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच तात्पुरती पूरक नळ योजनेच्या १ कोटी ५३ लाख ७० हजार रुपयांच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून नवीन विंधन विहिरी घेण्याच्या ६३ लाख २९ हजार रुपयांच्या ७२ प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे.


अवैध पाणी उपसा रोखण्यासाठी धडक कारवाई


जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात पाण्याचा अवैध उपसा रोखण्यासाठी प्रकल्पाशी संबंधित जलसंपदा अथवा जलसंधारण विभागाचे शाखा अभियंता, महावितरणचे शाखा अभियंता, संबंधित महसूल मंडळ अधिकारी, पोलीस उपनिरीक्षक यांची पथके गठीत करण्यात आली आहेत. या पथकांनी आतापर्यंत ५९ विद्युतपंप, १६१ स्टार्टर्स, १२३ बंडल वायर आदी साहित्य जप्त केले आहे. तसेच ८७६ वीज कनेक्शन तोडण्यात आली आहेत.

तक्रार निवारणासाठी जिल्हास्तरावर वॉर रूम

पाणी टंचाई निवारणार्थ जिल्ह्यात प्रभावी उपाययोजना करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या आहे. तरीही नागरिकांच्या पाणी टंचाईच्या अनुषंगाने काही तक्रारी असल्यास त्याचा निपटारा करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात ङ्गवॉर रूमम तयार करण्यात आली आहे. ०२३८२-२२०२०४ हा या वॉर रूमचा संपर्क क्रमांक असून नागरिकांना आपली तक्रार या क्रमांकावर नोंदविता येणार आहे. या कक्षामार्फत संबंधित विभागाशी समन्वय करून या तक्रारींचा निपटारा केला जाईल.






# मॅक्सवेलने दारावर हात मारला, फाफने युवा खेळाडूंचे मनोबल वाढवले




अहमदाबाद-आयपीएलच्या १७ व्या पर्वाचा पहिला टप्पा संपत असताना अगदी ३ मे पर्यत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु प्लेऑफमध्ये पोहोचेल असे कुणालाही वाटले नव्हते. आरसीबी तोपर्यंत गुणतालिकेत दहाव्या स्थ-ानावर होती. पुढच्या १५ दिवसांमध्ये आरसीबीच्या सर्व खेळाडूंनी दमदार कामगिरी करत, सलग सहा मॅचेसमध्ये विजय मिळवत गुणतालिकेत चौथ्या स्थानावर झेप घेत प्लेऑफमध्ये प्रवेश केला. आरसीबीला एलिमिनेटरमध्ये राजस्थान रॉयल्सकडून पराभव स्वीकारावा लागला. या पराभवानंतर रॉयल चॅलेंजर्स बंगळ-ुरुने एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओत मॅक्सवेल रुममध्ये जाताना दारावर हात मारताना दिसतो. विराट कोहली मोबाइलमध्ये काही तरी करण्यात व्यस्त असताना पाहायला मिळतोय. तर, दिनेश कार्तिकला सिराजने उचलून घेतलेले पाहायला मिळते. फाफ डु प्लेसिस युवा खेळाडूंसोबत चर्चा करुन त्यांचे मनोबल वाढवण्याचा प्रयत्न करताना पाहायला मिळतोय. आरसीबीनं पहिल्यांदा फलंदाजी करताना ८ विकेटवर १७२ धावा केल्या होत्या. तर, राजस्थ-ाननं ६ विकेटवर १७४ धावा करत क्वालिफायरमध्ये प्रवेश मिळवला. तर, बंगळुरुचं आयपीएलमधील आव्हान संपलं. या पराभवानंतर विराट कोहली, कॅप्टन फाफ डु प्लेसिस आणि दिनेश कार्तिक यांच्यासह संपूर्ण टीमचा एक व्हिडीओ बंगळुरुकडून शेअर करण्यात आला आहे. यामध्ये फाफ डु प्लेसिस, विराट कोहली आणि दिनेश कार्तिकनं यंदाच्या आयपीएलमधील प्रवास आणि राजस्थान विरुद्धच्या मॅचबद्दलच्या भावना मांडल्या आहेत.



**फाफ डु प्लेसिस काय म्हणाला?**

आयपीएलच्या पहिल्या टप्प्यात आम्ही सहा मॅचेस मगावल्या होत्या. चाहत्यांच्या अपेक्षा वाढलेल्या होत्या. आम्ही विशेष कामगिरी करायचे ठरवले आणि सूर गवसल्याचे फाफ डु प्लेसिसने म्हटले.

फाफ डु प्लेसिसने ड्यूचा परिणाम जाणवल्याचे म्हटले. याशिवाय त्याने त्याच्या १५ धावा कमी पडल्याचं सांगितले. आम्ही तळ-ाला होतो पण प्रत्येक स्टेडियमवर चाहते पाठिंबा देत होते.आम्ह-ाला सूर गवसल्यानंतर चांगली कामगिरी करुन दाखवली असे फाफ डु प्लेसिस म्हणाला. ट्रॉफी पर्यत पोहोचण्यासाठीची दोन पावले कमी पडली, असे फाफ डु प्लेसिसने म्हटले.

**विराट कोहली काय म्हणाला?**

विराट कोहलीने आयपीएलच्या पहिल्या टप्प्यात आमची कामगिरी समाधानकारक नव्हती, असे म्हटले. क्रिकेटर म्हणून ज्याप्रमाणं खेळ कला पाहिजे तसा खेळ होता नव्हता. यानंतर आम्ही व्यक्त होऊ लागला, आम्ही स्वाभिमानासाठी खेळू लागलो आणि आमचा आत्मविश्वास परत आला, असे विराट कोहली म्हणाला. पुढे आमच्या मनाप्रमाणे घडत गेले, आम्ही सहा मॅच जिंकल्या आणि प्लेऑफमध्ये प्रवेश केला. या टीममधील सर्व खेळाडूंचा अभिमान वाटतो. आम्हाला जसे खेळायचे होतो तसे खेळत होतो, असे विराट कोहलीने म्हटले. आरसीबीच्या चाहत्यांचे आभार मान-तो. फक्त बंगळुरुचे नाही तर देशभरात जिथे खेळलो तिथे चाहत्यांनी पाठिंबा दिला त्याबद्दल त्यांचे आभार मानतो, असे विराट कोहली म्हणाला.

दिनेश कार्तिकने काय म्हणाला?

सहा पैकी सहा मॅच जिंकणे हे आनंददायी होते. खेळामध्ये परिकथेचा शेवट होत नसतो. खेळात एखादा दिवस तुमच्या प्रमाणे नसतो तसाच दिवस आजचा होता, असे दिनेश कार्तिक म्हणाला. रात्रीच्या मॅचमध्ये ड्यूचा परिणाम जाणवतो, बॉल बॅटवर येतो पण आमच्या गोलंदाजांनी जी कामगिरी केली त्याचा अभिमान वाटतो, असे कार्तिक म्हणाला. आरसीबीसाठी हा विशेष हंगाम होता, असे कार्तिकने म्हटले.

**CHANGE IN NAME**

I have change my name from SHAIKH MAHATAB AMINSAB TO SHAIKH MAHETAB AMINSAB Hence froth this decleration and will be known by this name I will use SHAIKH MAHETAB AMINSAB in future the same name will be USED BY MY WIFE CHILDREN AND FAMILY.

**OLD NAME**
SHAIKH MAHATAB AMINSAB
**NEW NAME**
SHAIKH MAHETAB AMINSAB
**ADDRESS**
Gite Building Road, vikas Nagar, Latur (M.S.) 413512

**जाहीरनामा**

दिवाणी न्यायाधीश क. स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ७० / २०२४ निशाणी क्र. ०६

अर्जदार कचराबाई भ्र.भगवान इसाळे ज्यापेक्षा वडील नामे निवृत्ती देवराव गायकवाड हे दिनाक १८/०४/२०२३ रोजी मौजे बोळेगाव ता. देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. त्यांचे वारसदार खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| ०१ | कचराबाई भ्र.भगवान इसाळे | ५० | मुलगी |
| ०२ | केराबाई भ्र.निवृत्ती गायकवाड | ७० | पत्नी |

यांनी या कोर्टात सदरहू मयताचे Heirship certificate/वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरून असे कळविण्यांत येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयाताचे Heirship certificate/वारस प्रमाणपत्र देईल. सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १५/०५/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे. पुढील नेमलेली तारीख :- २५/०६/२०२४.

(आर.टी.शिंदे)
व.लिपीक

(आर.एस.वाघमारे)
प्र.सहायक अधिक्षक

# हार्दिक पांड्या आणि नताशाचा घटस्फोट? त्या घटनेमुळे चर्चांना उधाण

मुंबई,-गेल्या वर्षभरात अनेक चांगले कपल्स वेगळे होत असल्याने सोशल मीडियावर वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे. आता हार्दिक पांड्या आधीच आयपीएलमुळे नको असलेल्या रेकॉर्ड्ससाठी चर्चेत आला आहे.नताशा स्टेनकोविक आणि क्रिकेटर हार्दिक पांड्या यांच्यात सर्व काही ठीक चालले आहे का? हे प्रश्न समोर येत आहेत कारण सोशल मीडियावर जे सध्या सुरू आहे त्यावरुन दोघंही घटस्फोट घेणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

आयपीएलमध्ये अत्यंत वाईट कामगिरी केल्यानंतर हार्दिक पांड्याच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. हे वर्ष त्यांच्यासाठी खूपच वाईट ठरले आहे. ींू वरील लोकांना हार्दिक आणि नताशाच्या नात्यावरुन चर्चा सुरू केली आणि चिंताही व्यक्त केली आहे.

नताशाने तिच्या सोशल मीडिया अकाउंटवरून पांड्या आडनाव काढून टाकल्यानंतर दोघांमध्ये काहीतरी बिनसल्याची चर्चा सुरू झाली आहे. रेडिटवर याबाबत अनेक चर्चा सुरू झाल्या आ-हेत. दोघंही एकमेकांचे कोणतेही फोटो शेअर करत नाहीत किंवा त्यावर काहीही बोलत नाहीत. आधी नताशाच्या इंस्टाग्रामवर नताशा स्टेनकोविक पांड्या असं नाव लिहिलं होतं, आता तिने आडनाव काढून टाकलं आहे.

याशिवाय असा दावा केला जात आहे की, नताशाच्या वाढदिवसाची पोस्ट हार्दिक पांड्याने टाकली नाही. नताशाने हार्दिकसोबत असलेले फोटो आणि पोस्ट हटवल्याने या चर्चांनी जास्तीच जोर धरला आहे. दोघांच्याही सोशल मीडिया अकाउंटमध्ये अनेक बदल झाल्याचं दिसत आहे. दोघांचे फोटो गायब झाले असल्याने त्यांच्यात काही बिनसल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

नताशाने २०१३ मध्ये प्रकाश झा यांच्या 'सत्याग्रह' चित्रपटातून इंडस्ट्रीत पदार्पण केले. टीव्ही अभिनेता अली गोनीसोबत ब्रेकअप झाल्यानंतर नताशाने टीम इंडियाचा क्रिकेटर हार्दिक पांड्याच्या प्रेमात पडली. ते एका नाईट क्लबमध्ये भेटले मैत्रीचं प्रेमात रुपांतर झालं आणि नंतर लिव्हइनमध्ये राहू लागले. दोघांनी खास लोकांच्या उपस्थितीत लग्न केलं. ३० जुलै २०२० रोजी नताशाने गोंडस मुलाला जन्म दिला.

**CHANGE IN NAME**

I have change my name from SAYYAD UFERA BEGUM to SAYYED UFERA BEGUM SABERALI Hence froth this decleration and will be known by this name I will use SAYYED UFERABEGUM SABERALI in future the same name will be USED BY MY WIFE CHILDREN AND FAMILY.

**OLD NAME**
SAYYAD UFERA BEGUM
**NEW NAME**
SAYYED UFERABEGUM SABERALI
**ADDRESS**
LATUR KALAMB ROAD, AT POST- JAWALA (B.K.) TQ- & DIST- LATUR (M.S.) 413511

**CHANGE IN NAME**

I have change my name from SAYYAD SABIRALI MAHAMADALI TO SAYYED SABERALI AHEMADALI Hence froth this decleration and will be known by this name I will use SAYYED SABERALI AHEMADALI in future the same name will be USED BY MY WIFE CHILDREN AND FAMILY.

**OLD NAME**
SAYYAD SABIRALI MAHAMADALI
**NEW NAME**
SAYYED SABERALI AHEMADALI
**ADDRESS**
LATUR KALAMB ROAD, AT POST- JAWALA (B.K.) TQ- & DIST- LATUR (M.S.) 413511

**DECLARATION**
**Change of Name**

I have changed my name from WASIMA BEGUM SAYYED to WASIMA SAYYED
Hence for this declaration. And in future I will use my new name WASIMA SAYYED.
Also, in future the same name will be used by my family.
**Old Name :** WASIMA BEGUM SAYYED
**New Name :** WASIMA SAYYED
**Address**
MAHEFUZ MANZIL, NEAR EMPLOYMENT OFFICE, KHORI GALLI, LATUR, 413531, MAHARASHTRA, INDIA

**वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा**

मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३४६/२०२४ निशाणी क्र.०७

ज्याअर्थी नामे Ramchandra 5/o Changalappa Ambesange हे R/o. Loni Tq. Udgir Dist. Latur दि. ०४/०२/२०२४ रोजी At Udgir Tq.Udgir Dist.Latur, येथे मयत झाले आहेत.व अर्जदार

1) Putalabai Ramchandra Ambesange, Age-74, Occu -HH
2) Balaji Ramchandra Ambesange, Age-45, Occu -Business
Both R/O Khatib Galli, Choubara Road, Udgir Dist. Latur
3) Minakshi Bhimashankar Nagthan, Age-59, Occu. -H.H. R/O. JALKOT TO UMARGA DIST OSMANABAD
4) Shama Bandeshwar Sawalagi Age-57, Occu -H.H R/O. MC QUARTERS, SOLAPUR
5) Shanta Rajshekhar Kavlas Age-50. Occu -H.H. R/O ZAHEERABAD DIST SANGAREDDY
6) Rakha Vaijanath Tukshette, Age-47, Occu. -HH R/O. SHIMOGA (KARNATAKA)

यांनी खालील नमुद ६ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असुन,

| Sr.no | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 01 | Putalabai Ramchandra Ambesange | 74 | Wife |
| 02 | Balaji Ramchandra Ambesange | 45 | Son |
| 03 | Minakshi Bhimashankar Nagthan | 59 | Daughter |
| 04 | Shama Bandeshwar Sawalagi | 57 | Daughter |
| 05 | Shanta Rajshekhar Kavlas | 50 | Daughter |
| 06 | Rakha Vaijanath Tukshette | 47 | Daughter |

अर्जदार याने Ramchandra 5/o Changalappa Ambesange या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहु वारसदार सदरहु मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु Ramchandra 5/o Changalappa Ambesange यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १७/०५/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख ०६/०७/२०२४

(एच.ए.शेख)
कनिष्ठ लिपीक
२ रे सहदिवाणी न्यायालय,
क.स्तर उदगीर

(एस.एम.शेटे)
सहायक अधिक्षक
सहदिवाणी न्यायालय,
क.स्तर उदगीर

**वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा**

मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३७०/२०२४ निशाणी क्र.०७

ज्याअर्थी नामे Maroti S/o Nagu Kamble हे R/o. Loni Tq. Udgir Dist. Latur दि. ०९/०८/२०१८ रोजी At Loni Tq.Udgir Dist. Latur, येथे मयत झाले आहेत.व अर्जदार

1) Shyam S/o Maroti Kamble Age-44. Occu labour R/o. Lani Ta Udgir Dist. Latur

यांनी खालील नमुद ८ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असुन,

| Sr.no | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| ०१ | जनाबाई भ्र.मारोती कांबळे | ७० | पत्नी |
| ०२ | आनंद पि.मारोती कांबळे | ५५ | मुलगा |
| ०३ | राम पि.मारोती कांबळे | ५३ | मुलगा |
| ०४ | शाम पि.मारोती कांबळे | ४४ | मुलगा |
| ०५ | सुरेश पि.मारोती कांबळे | ४२ | मुलगा |
| ०६ | राजाबाई भ्र. दिगंबर शिंदे | ५२ | मुलगी |
| ०७ | तेजाबाई भ्र. काशिनाथ तांबरे | ५० | मुलगी |
| ०८ | रमाबाई भ्र. त्र्यंबक कांबळे | ४८ | मुलगी |

अर्जदार याने Maroti S/o Nagu Kamble या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहु वारसदार सदरहु मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु Maroti S/o Nagu Kamble यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १७/०५/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख ०६/०७/२०२४

(एच.ए.शेख)
कनिष्ठ लिपीक
२ रे सहदिवाणी न्यायालय,
क.स्तर उदगीर

(एस.एम.शेटे)
सहायक अधिक्षक
सहदिवाणी न्यायालय,
क.स्तर उदगीर

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर-४३१००२**

**नमूना अ यू**
**(जाहीर नोटीस)**

**प्रकरण :-** वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करण्याच्या अनुषंगाने नोटीस.वक्फ संस्था :-**Jama Masjid, -At. Ujani, Village. Ujani, Tq. -Ausa, Dist. Latur**

ज्याअर्थी, वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३२ अन्वये राज्य वक्फ मंडळाला राज्यातील वक्फ संस्थेचे प्रशासन करण्याकरीता वक्फ संस्थेची योजना वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये मंजूर करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी, वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६/४३ अन्वये **Jama Masjid. -At. Ujani, Village. Ujani, Tq. -Ausa, Dist. Latur** ही संस्था नोंदणीकृत असून या संस्थेचा नोंदणी क्रं. **MSBW/LTR/391/2022** असा आहे, आणि ज्याअर्थी **Mr. Hamid Khurban Sherikar Ors, -Add. -At. Ujani, Village, Ujani, Tq. Ausa, Dist. Latur** यांनी दिनांक. २३/०२/२०२३ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या हितासाठी व या वक्फ संस्थेच्या सूयोग्य व्यवस्थापनाकरीता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे योजना सादर केली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र राज्य वक्फ नियम २०२२ मधील नियम क्रं. ३७ (१) अन्वये सदर वक्फ संस्थेच्या व्यवस्थानासाठी योजना मंजूर करण्याचा प्रस्ताव विचारात घेताना या वक्फ संस्थेच्या योजनेविषयी गैरअर्जदार यांच्या काही तक्रारी, आक्षेप असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्याकडे आपले म्हणणे दाखल करावे, असे सुचित करण्यात येत आहे.

**स्वाक्षरीत**
**(जुनेद सय्यद)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य**
**वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर**

**दक्षिण मध्य रेल्वे**

दक्षिण मध्य रेल्वेच्या सविस्तर माहितीसाठी आपण www.scr.indianrailways.gov.in या संकेतस्थळावर पाहू शकता

खुली ई-निविदा नोटीस नॉस. सी/ई.२९/इलेक्ट/एम/एससी/०५/पीए/ओटी/२०२४-२५ दिनांक:२१.०५.२०२४

PUB/0483

भारताचे राष्ट्रपती यांचे वतीने व त्यांचेसाठी खाली सही करणारांनी स्वतंत्र मोहोरबंद निविदा खालील प्रमाणे काम करण्यासाठी दिनांक १२.०६.२०२४ रोजी १५.०० वाजेपर्यंत ई. निविदा मागविण्यात येत आहेत.

---

**१.टेंडर नं:** सी/ई.२९/इलेक्ट/एम/एससी/२९/इलेक्ट/एम/एससी/०५/पीए/ओटी२०२४-२५ इ टेंडर नं.एम-एससी-०५-ओटी-२०२४-२५

**कामाचे नाव-** सिकंदराबाद विभाग- विद्युत देखभाल विभाग-विभाग - पुरवठा आणि स्थापना

प्रवासी लिफ्ट (एकूण १२ संख्या) (२ ZN, YDD, MDR, PDPL येथे प्रत्येकी संख्या. ZB आणि BMT स्टेशन) विविध स्थानकांवर अमृत भारत स्टेशनच्या संदर्भात

**स्किम टेंडर निविदा** :(रु):३४९०२१३४.००
**ईएमडी :** (रू) ३२४५००.००
**सीटीएफ:** (रू) ०.००
**पूर्ण होण्याचा कालावधी :** ९ महिने

---

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता,**
ए ०६१६ **(एम), सिकंदराबाद**

**निविदा च्या पुढील अटी व आधिक माहितीसाठी (निविदाकागदपत्रात उपलब्ध)आणि कागदपत्र डाउनलोड करणेसाठी आमची वेबसाईटला https://www.ireps.gov.in or www.scr.indianrailways.gov.in भेट द्या**

**कल्याण बाजार**

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

**मिलन नाईट बाजार**

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.

संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

**नशिबाची परिक्षा**

गोल्डन विक्री चान्सेस

**मिलनम डे**

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ४-७ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

**कल्याणम**

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ०-४ | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26



# यशवंत

शुक्रवार दिनांक २४ मे २०२४

उदगीर

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# उदगीरात बुध्द जयंती उत्साहात साजरी

## नालंदा बुध्दविहार रेल्वे स्टेशन येथे पंचशील ध्वजारोहण व भव्य मिरवणुक









उदगीर : येथील रेल्वे स्टेशन उदगीयेथील नालंदा बुध्दविहार येथे तथागत गौतमबुध्द यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रारंभी पंचशिल ध्वजारोहण भंते धम्म बोधी यांच्या करण्यात आले .या नंतर महात्मा गौत्मा गौतम बुध्द याना पुष्प अर्पण करुन त्रिशरण आणी पंचशिल घेऊन वंदन करण्यात आले .यावेळी शहर पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक करण सोनकवडे, दयानंद शिंदे, वसंत गोखले, धनाजी बनसोडे, दिलिप कांबळे, माधव कांबळे, प्रा.भारत कधारे, सुनिल कांबळे यांच्यासह समता सैनिक दल उपस्थित होते.

भव्य रथामध्ये तथागत महात्मा गौतम बुध्द यांची प्रतिमा ठेवून भव्य मिरवणूक बसवैश्वर चौक, डॉ.बाबासाहेब अंबेडकर चौक,तळवेश, चौबारा, कार्नर, पोलिस स्टेशन या प्रमुख मार्गे नालंदा विहार येथे या मिरवणूकीचा समारोप झाला.या मिरवणूकित धम्मदेशना ,भंते धम्मबोधी यांनी केले. नालंदा बुध्दविहारच्यावतीने मिरवणूकित सहभागी झालेल्या उपासकांना फळ व अल्पोपहार वाटप करण्यात आले.

यावेळी प्रितम सुर्यवंशी,प्रतिक कांबळे,निखिल सुतार, आनंद डोरनाळीकर,सुशिल गोखले, संजय गायकवाड,प्रा.सचिन कांबळे,प्रेम जवळगेकर या परिश्रम घेतले

# बाबासाहेब आंबेडकर सभागृहात बुध्द जयंती साजरी

उदगीर/ प्रतिनिधी

उदगीर येथील महार हडोळा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे दि. २३ मे रोजी महामानव तथागत गौतम बुद्ध यांची जयंती साजरी करण्यात आली.

देगलूर रोडवरील नियोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमेचे व तथागत गौतम बुद्धांची प्रतिमेचे पूजन महेंद्र सूर्यवंशी, उत्तम पकोळे, गौतम कांबळे, महेश गंडारे, शिवाजी पकोळे, विठ्ठल कांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी परिसरातील बौध्द बांधव उपस्थित होते. उपस्थित बांधवांनी पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी पंचशील ध्वजावरण राजकुमार पकोळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्रिशरण- पंचशील घेऊन बौद्ध जयंती साजरी करण्यात आली. गौतम कांबळे, महेंद्र सूर्यवंशी, उत्तम पकोळे, बाबासाहेब सूर्यवंशी,



राजकुमार पकोळे, महेश गंडारे, शिवाजी पकोळे, मुकेश गायकवाड, प्रेम गायकवाड, सचिन पकोळे, संतोष जाधव, प्रकाश जाधव, श्रीकांत लोकरे, स्वप्निल पकोळे, मुकेश गायकवाड, आदींची उपस्थिती होती.

०००

# समर्थ विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

वाढवणा बु :

तालुक्यातील एकुर्का रोड येथील समर्थ कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मार्च २०२४ च्या बारावी बोर्ड परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केल्याबद्दल गुरूवारी गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकासह सत्कार करण्यात आला.




अध्यक्षस्थानी संस्थासचिव प्राचार्य प्रमोद चौधरी उपस्थितहोते. तर प्रमुख पाहूणे म्हणून पर्यवेक्षक सिद्धार्थ बोडके, संस्थासदस्य प्रा. एम. व्ही. स्वामी, सत्यशोधक पर्यावरण विकास विद्यालयाचे मुख्याध्यापक सी. वाय. पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विज्ञान शाखेतून केंद्रात प्रथम आलेली सोनम शिवकुमार तोंडारे, व्दितीय सौंदर्या संतोष अंबेसंगे व सुशील संतोष कोरे, तृतीय शितल उत्तम जाधव व मंथन गोपाळ चव्हाण तर कला शाखेतून आळंदीकर गणेश सुरेश प्रथम, ओम रमेश कुंडगीर द्वितीय, अम्रपाली प्रेमनाथ सोनकांबळे व रिहाना कबीर पठाण तृतीय यांचासह एचएसव्हीसी शाखेतून द्वितीय आलेला अरफ्फान शेख करिम शेख यांचाही सत्कार करण्यात आला.

सुत्रसंचालन रसूल पठाण यांनी केले. तर आभार अमर जाधव यांनी मानले.

००००

# शंकर उच्च माध्यमिक आश्रम शाळेचे एचएससी बोर्ड परीक्षा २०२४ मध्ये घवघवीत यश

उदगीर:- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या फेब्रुवारी/मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या एच एस सी बोर्ड परीक्षेत आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी उज्वल यशाची परंपरा कायम राखत शाळेचा यावर्षीचा निकाल ९८.२४% इतका लागला आहे. विज्ञान विभागाचा निकाल ९८.६२% लागला असून या विभागातून चैनपुरे सुप्रिया गणेश ८१.०० % घेऊन प्रथम आली आहे तर बिरादार आकांक्षा बालाजी ८०.८३% घेऊन द्वितीय तर पाटील ऋतुजा गोविंद ८०.३३% टक्के घेऊन तृतीय आली आहे. तर कला विभागाचा निकाल ९७.५९% लागला असून मुंडे प्रतीक्षा सूर्यकांत ७९.६७% प्रथम, बिरादार प्रतीक्षा त्र्यंबक ७७.८३% घेऊन व्दितीय तर राठोड अर्जुन शिवाजी ७६.८३% घेऊन तृतीय आला आहे. यासह विशेष प्राविण्यासह ३७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत तर प्रथम श्रेणीत १३६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सर्व गुणवंत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब राठोड, सचिव अमित राठोड, आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका शेरे त्रिवेणी, उप मुख्याध्यापक स्वामी एस. जी. पर्यवेक्षक पाटील वाय. एस., केंद्र संचालक बिरादार बी. जी. व सर्व शिक्षकांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# डॉ.अन्नपुर्णा अक्का यांचे निधन



बिदर (प्रतिनिधी) : डॉ.अन्नपुर्णा अक्कायांच्या अल्पशा आजाराने निधन झाले. बिदर येथील शरण उद्यान व बसव सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ.अन्नपुर्णा अक्का यांचू अल्पशा आजाराने गुरुवार दि.१)२३ मे २०२४ रोजी बिदर दवाखान्नात उपचिर घेत असताना निधन झाले.मृत्यु समयी ते ५० वर्ष होते. डॉ.माते महादेवी ,डॉ.गंगा माताजी यांच्या समवेत त्यांनी संपुर्ण कर्नाटक राज्यात महात्मा बसवेश्वरांच्या कार्यांचा प्रचार व प्रसार करण्याचे काम केले. त्यानी म.बसवेश्वर ,अक्का महादेवी,व शरणांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे साहात्याचे लिखान ग्रंथरुपात प्रकाशित केले. लिंगायत धर्मास स्वतंत्र धर्माची मान्यता मिळवण्यासाठी अनेक ऑदोलनात सक्रिय सहभाग नोंदवला होता. प.पु.डॉ.बसवलिंग पट्टदेवरु यांच्या समवेत त्यांनी महाराष्ट्रात बसव तत्वाची प्रचार व प्रसार केला.त्या पार्थिव देहावर आज शुक्रवार दि. २४ मे रोजी सकाळी ११ बिदर येथे अंत्यसंस्कार होणार आहे.डॉ. अन्नपुर्णा अक्कास दैनिक यशवंत परिवाराची भावपुर्ण श्रध्दांजली.

# खरीप हंगाम तोंडावर...

## गतवर्षीचा विमा कधी पडणार बँक खात्यावर

हंडरगुळी / विठ्ठल पाटील :

यंदाचा खरीप हंगाम तोंडावर आला असुन बळीराजा पेरणीसाठी तयारी करण्यात मग्न झाला आहे.मात्र गत वर्षीचा विमा अद्यापही बँक खात्यात जमा झाला नाही.यामुळे जुन २०२४ पर्यंत तरी विमा हाती पडावा.अशी आशा हाळी-हंडरगुळीतील शेतकरी बाळगुन आहेत.

गत वर्षी अत्यअल्प पाऊस झाल्याने खरीब व रब्बी हे २ ही हंगाम वाया गेले होते.आणि नमो शासनाने जाहिर केल्यानुसार १ रुपयात पिकांचा विमा काढला.मात्र अद्याप पर्यंत विमाच्या छदाम ही हाती लागला नसल्यामुळे हा रुपयाचा विमा पॉलिसी निवडणुक ड्रामा तर नव्हता ना.अशी कुजबूज या भागात ऐकू येत आहे.आणि हा ड्रामा नसेल तर मग विमा मिळनार कधी. या कडे आर्थीक संकटातील शेतक-यांचे लक्ष लागले आहे. विम्यासह गरजू शेतक-यांना पिक कर्ज ही मिळत नसल्याने नाविलाजास्तव खाजगी अवैध सावकारांचे उंबरठे झिझवावे लागते.आणि आमची नड बघून हाळीतील कांही खाजगी अवैध सावकारी करणारे लोकं बिच्चा-या शेतक-यासह जनतेला अव्वाच्या - सव्वा व्याज घेऊन कच्चे खातात. अशी हाळीत जनता चर्चा करतात.

लातुर जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करुन २५ % अग्रीम रक्कम अनेक गावातील शेतक-यांना मिळाली.मात्र येथील शेतक-यांना ना विमा मिळाला ना अग्रीम रक्कम.तसेच हे सर्व कमी म्हणुन की काय फ्रेब्रुवारी - २४ पासुन अनेकदा पडलेल्या अवकाळी पावसाने झालेल्या पिकांची नुकसान भरपाई पण मिळाली नाही.यामुळे ही २ गावं लातुर जिल्ह्यात आहेत का नाहीत.अशी चर्चा संतप्त शेतकरी वर्ग करित असताना ऐकू येते.

यंदाच्या मान्सुनची चाहूल लागण्या- पुर्वीच शेती मशागतीसह पेरणीसाठी शेतकरी तयार झाला आहे.मात्र अति अत्यल्प जमीन असलेल्यांना पेरणी करण्यासाठी पेशांची चणचण आहे. म्हणुन गतवर्षीच्या पिक विम्यासह अग्रीमची रक्कम खात्यावर पडणार कधी.आणि ही रक्कम हाती लवकर पडली नाही तर मग नाविलाजास्तव खाजगी अवैध सावकाराकडे जावे लागणार.आणि मग सावकार मंडळी बिच्चा-या शेतक-यांना बेभावाने पैसे देऊन कच्चे खाणार. अशी चर्चा हाळी या गावात हळू आवाजात ऐकू येते.व गरजु शेतक-यांना ना बँक पीक कर्ज देतात.ना शासनकर्ते मदत करतात.या मुळे नाविलाजास्तव बहूतांश राजांना आपला बळी द्यावा लागतो.ही सत्यता नाकारता येत नाही.तेंव्हा खरीपाच्या तोंडावर तरी अग्रीमसह विम्याची रक्कम खात्यात जमा होईल का.व यासाठी कोणत्या पार्टीचा तालुकाध्यक्ष लक्ष देणार ? असा प्रश्न या निमित्ताने शेतकरीबंधू मधून विचारला जात आहे..

००००

## कागदपत्रे हरवली आहेत

माजी धनश्री संभाजी वाघमारे या नावाचे कॉस्टव्हलिडिटी, दहावी पास मार्क मेमो व सनद, बारावी पास मार्क मेमो, दि.११/४/२०२४ रोजी अहमदपूर ते उदगीर बस प्रवासात हरवली आहे तरी कुणाला सापडली तर ९०४९०३५३८४ नंबरवर संपर्क करावा.

# शि. भ. प. अनिताताई हैबतपूरे यांच्या प्रासादिक वाणीतून प्रसवले प्रसाददानाचे चिंतन

उदगीर (शिवाप्पा पाटील) :

उदगीरचे आराध्य दैवत श्री. गुरु हावगीस्वामींच्या मठ सुवर्ण कलशारोहण सोहळ्यानिमित्त आयोजित केलेल्या उदगीर येथील अखंड शिवनाम सप्ताह व ५०५१ शिवभक्तांचा ग्रंथराज परमरहस्य पारायण सोहळ्याच्या सातव्या दिवशी रविवार (ता. १९) रोजी प्रास्ताविकात प्रसिद्ध प्रवचनकार व गायिका शिव भक्ती परायण अनिता शिवानंद हैबतपूरे यांनी गुरु माउली मन्मथ स्वामी महाराज यांच्या प्रसाददानावर आपल्या प्रासादिक शैलीतून चिंतन मांडले.

यावेळी सौ. हैबतपूरे यांनी आपल्या रसाळ आणि मधाळ वाणीतून उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध करत परम रहस्य ग्रंथासह वेदांताचे सार



उलगडून सांगितले.

ज्ञानियांचा राजा, संतांचा शिरोमणी असलेल्या मन्मथ स्वामींचा परमरहस्य ग्रंथ म्हणजे शब्दांच्या बळावर निर्गुण असलेला ब्रम्ह सगुण साकार करण्याचे रहस्य होय, असे मौलिक चिंतन यावेळी शि. भ. प. अनिता हैबतपूरे यांनी मांडले. वीरशैव - लिंगायत धर्म सभेला संबोधित करताना त्या पुढे म्हणाल्या की, २८ आगम आणि चार वेदांताचे सार म्हणजेच परमरस्य ग्रंथ असून सामान्य माणसाच्या जगण्यासाठी लागणारे उत्तम संस्कार आणि सभ्यता सांगणारा हा अमूल्य ग्रंथ आहे. या ग्रंथात जेवढे सार मन्मथ माउलींनी सांगितले त्या संपूर्ण परमरहस्य ग्रंथाचे सार म्हणजे मन्मथ माउलींच्या वाकब पुष्पातला बारा ओव्यांचे प्रसाददान आहे. या प्रसाददानाची सुरुवात करताना मन्मथ माउलींनी शब्दालाच ईश्वराची उपमा दिली असल्याचे विवेचन सौ. हैबतपूरे यांनी केले.

बसवलिंग प्रभूंनी मन्मथ माउलींचा हा प्रसाद ङ्बसवलिंग म्हणे ब्रम्ह जे निर्गुण, केले ते सगुण शब्द बळेङ्क अशा नितांत सुंदर शब्दांत व्यक्त केला. यास्तव, शब्द हेच सृष्टीचा आधार असल्याने शब्द

नेहमी मंगल आणि शुद्ध असावेत, असेही त्या म्हणाल्या. शब्दांच्या उपासनेपासून ते मुक्तिपदापर्यंतची सुंदर उपासना परमरहस्य ग्रंथात सांगितली असल्याचेही विवेचन त्यांनी केले. सोबतच परोपकाराची भावनादेखील व्यक्तीच्या अंतःकरणात निर्माण झाली पाहिजे. असा सुंदर भाव निर्माण होणे म्हणजेच प्रसाद घेतल्यासारखे आहे, असेही मत यावेळी प्रवचनकार अनिता हैबतपूरे यांनी व्यक्त केले.

सौ. हैबतपूरे यांनी मांडलेल्या चिंतनशील विचारांनी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, मठाधीश डॉ. शंभूलिंग शिवाचार्य महाराज यांच्यासह भाविक भारावून गेल्याचे दिसून आले.

००००

# कायद्याचा जरब नसल्याने हाळी व हंडरगुळीत वाढले अल्पवयीन चालक

हंडरगुळी / वार्ताहर :

विविध प्रकारचे कायदे,नियम व अटी हे लातुर,उदगीर,अहमदपुर,निलंगा या सारख्या शहरी भागासाठी आहेत. म्हणुनच उदगीर तालुक्यातील हाळी - हंडरगुळी या गावात मिसरुडं ही न फ्फुटलेली बालके धुम स्टाईल बाईक चालविताना दिसतात.आणि आजवर प्रशासनाने कारवाई करायचे धाडस दाखविले नसल्याने ट्रिपल व चोबल सिट बसवुन विना नंबरच्या तसेच मुदतबाह्य झालेल्या बाईक्स फ्फटाका सायलंन्सर वाजवित गल्लीबोळात व राज्य मार्गावर धुम स्टाईल नाबालक मंडळी पळविताना दिसतात.आणी पुण्यासारखी दुर्देवी घटना घडल्या - वरच संबंधित अधिकारी कारवाहीचा बुलडोझर चालविणार का ? तसेच सर्व प्रकारचे कायदे व त्याचा वापर करण्याचे अधिकार हे फ्फक्त शहरी भागासाठीच मर्यादीत आहेत का ? असे प्रश्न अशा वाहनधारकांमुळे हैराण झालेले हाळी- हंडरगुळीत चर्चीले जात आहे.तसेच अशा वाहन चालकांवर कारवाई नाही केल्यास पुण्यासारखी दुर्देवी घटना घडू शकते.

देशात नविन मोटार वाहन कायद्या - सह अन्य कायदे लागु झाले असुन, या कायद्याचा वापर हा गल्लीपासुन दिल्ली पर्यंत करण्याचा अधिकार हा संबंधित प्रशासनाला आहेत. मात्र नांदेड-बिदर या राज्यमार्गालगत असलेल्या तसेच उदगीर नंतर उदगीर तालुक्यात सर्वात मोठी बाजार पेठ व लोकसंख्या असलेल्या तसेच भावी तालुका म्हणुन ओळखले जाणा-या हाळी-हंडरगुळी या २




गावात विविध प्रकारच्या कायद्याची अंमलबजावणी संबंधितांकडून होताना दिसत नाही. म्हणुन कायद्याच्या आयचा घो ! असे म्हणत नियम,कायदा पायदळी तुडव- णारी गँगच निमाण झाली असुन,या गावात सर्रासपणे नाबालक असलेले शेकडो पोरं ट्रिपल,चोबल सिट बसुन फ्फटाका सायलंन्सर वाजवित बाईक धुम स्टाईल चालविताना दिसतात.व आजवर कुणीच कारवाही करण्याचे धाडस दाखविले नसल्याने विनानंबर व मुदतबाह्य गाड्या बिनबोभाटपणे या रोडवर धावताना दिसतात. तसेच या अशा बाईक चालकांना ट्रीपल व चोबल सिट्स बाईक चालवण्याचा परवाना दिला कुणी. आणि यातील एखाद-दुसरी गाडी चोरीची असु शकते.अशी चर्चा हाळीत होतेय. अशा वाहनधारकांवर कारवाई केली जाईल.असे आश्वासन कांही महिण्या पुर्वी शांतता समितीच्या बैठकीत स. पो.नी.भिमराव गायकवाड यांनी दिले होते.पण अद्याप एकावरही कारवाई झाली नाही.यामुळे सर्व कायदे,नियम हे फ्फक्त शहरी भागासाठीच आहेत का.नसतील तर मग येथील वाहन- धारकांवर कारवाई कधी करणार ? एखादा मोठा अपघात झाल्यावर का. यासारखे प्रश्न शांतता समितीच्या त्या बैठकीत उपस्थित असलेल्या कांही मान्यवरातुन उपस्थित केले जातात. तेंव्हा या ठिकाणी पुणे,मुंबई सारखी हिट अॅन्ड रण , ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह अशा प्रकारच्या दुर्घटना घडण्याची वाट न पाहता प्रशासनाने त्वरीत अॅक्शन घ्यावी. अशी मागणी जनता व व्यापारी बांधवातुन जोर धरत आहे.

००००

## बालीकाबाई पाटील यांचे निधन



देवणी : दवणहिप्परगा ता.देवणी येथील बालीकाबाई गुणवंतराव पाटील वय६५ यांचे गुरूवार दि.२३ रोजी दुपारी बारा वाजता निधन झाले. त्यांच्यावर दवणहिप्परगा येथील त्यांच्या शेतात सायंकाळी साडेपाच वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पती दोन मुले, मुलगी,सूना नातवंडे असा परिवार असून दवणहिप्परगातील ग्रामीण डाक सेवक तथा माजी सैनिक गुणवंतराव पाटील यांच्या त्या पत्नी होत.

## बालाप्रसाजी किशनलालजी धूत यांचे दुःखद निधन



उदगिर/प्रतिनिधी :

येथील आनंद नगर मार्केट यार्ड जवळील बालाप्रसाद धूत कपड्याचे व्यापारी यांचे वयाच्या ९० व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन त्यांच पाशच्यात ऐक मुलगा ,दोन मुली व नातू पंतु आहेत ते अलका साडी सेंटर चे मालक भगवान धूत यांचे वडील होते.

००००